RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लिऐही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : १९२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 30 September 2025 | Year : 5 | Issue : 192 | Daily | Rate: Rs. 5/-

# गांधी जयंतीला हत्याऱ्यांचा उत्सव ?



तुषार गांधींचा संघावर घणाघात

## 'हरे राम हरे कृष्ण, वोट चोर गद्दी छोड' च्या घोषणा देत दीक्षाभूमीहून तुषार गांधी यांची पदयात्रा सेवाग्राम कडे निघाली

**नागपूर :** ही संविधान सत्याग्रह पदयात्रा संविधान, लोकशाही मजबूत करण्यासाठी आणि जे संविधानावर हल्ले होत आहेत त्याबद्दल लोकजागृती करण्यासाठी आहे, असे महात्मा गांधी यांचे पणतू आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी म्हणाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांचा शताब्दी सोहळा 2 ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या दिवशी साजरा करीत आहे. त्याबद्दल विचारले असता तुषार गांधी म्हणाले ही विटंबना आहे. बापूंचे हत्यारे त्यांच्या जयंतीदिनी त्यांचा शताब्दी सोहळा साजरा करीत आहेत ही विटंबना लोकांपर्यंत पोहोचवण्याचाच या पदयात्रेचा हेतू आहे, असेही ते म्हणाले. 'हम भारत के लोग' या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज सकाळी साडेसहा वाजता नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीतून जल्लोषात सुरुवात झाली. ही पदयात्रा सेवाग्राम येथील बापू कुटीपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. संविधानाच्या रक्षणासाठी, लोकशाहीच्या मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी व गांधी विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ही यात्रा सुरू करण्यात आली आहे.

पदयात्रेच्या प्रारंभी मोठ्या संख्येने नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते यामध्ये सहभागी झाले होते. *यामध्ये काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री सुनील केदार, राजेंद्र मुळक, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, तसेच सामाजिक कार्यकर्त्या व शिवसेना उद्धव गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, अवंतिका लेकुरवाळे, काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे, कुंदा राऊत यांचा सहभाग लक्षणीय होता.* 'हम भारत के लोग' संस्थेचे कार्यकर्ते व पदाधिकारीही पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पदयात्रेचा आरंभ ढोल-ताशांच्या गजरात व भजन मंडळींच्या भक्तिगीतांनी झाला. संपूर्ण मार्गात हरे राम हरे कृष्ण, देवकीनंदन गोपाला, 'वोट चोर गद्दी छोड़', 'संविधान बचाओ', 'लोकशाही वाचवा', अशा घोषणा देण्यात येत होत्या. या घोषणांमधून सरकारविरोधी भावना आणि संविधान रक्षणाबाबत जनजागृतीचा स्पष्ट संदेश दिला जात होता.

# मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर

## विविध घटनांत सहा जणांचा मृत्यू

- नाशिक जिल्ह्यात संततधार
- बीडमध्ये पुन्हा 'एनडीआरएफ' दाखल
- महामुंबईत मुसळधार

**मुंबई :** राज्यातील अनेक जिल्ह्यांना रविवारी अतिमुसळधार पावसाने झोडपले. मुंबई, ठाणेसह मराठवाडा, विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात शनिवारी रात्रीपासूनच पावसाचा जोर अधिक होता. यादरम्यान बुलढाण्यात दोन घटनांत चौघे वाहून गेले, त्यात एकाचा मृत्यू, तिघे बेपत्ता आहेत. अहिल्यानगरमध्येही पुरात वाहून गेल्याने दोघांचा तर नाशिकमध्ये पावसामुळे भिंत कोसळून तिघांचा मृत्यू झाला.





दरम्यान, संपूर्ण राज्यात मंगळवारपासून पावसाचा जोर कमी होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात व जायकवाडी धरण क्षेत्रात शनिवारी रात्रभर पाऊस झाल्याने मराठवाड्यातील अनेक गावांना पुराचा धोका वाढला आहे. मराठवाड्यातील 196 मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. कन्नड येथे मदन झब्बू राठोड (55) हे ब्राह्मणी नदीत वाहून गेल्याची घटना घडली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. अहिल्यानगरमधील शिर्डी-राहाता शिवाराजवळ ओढ्यावरून जाताना दोन दुचाकीवरील चौघे पाण्यात वाहून गेले. या वेळी बचाव पथकाने अक्षय घोडे (25) व अमोल व्यवहारे (रा. कोपरगाव) या दोघांना वाचवले. तर वाहून गेलेल्या प्रसाद विसपुते (रा. कोपरगाव) आणि रोहित खरात (वय 24, रा. पंधरा चारी, राहाता) यांचे मृतदेह सापडल्याची माहिती शिर्डी पोलीस ठाण्याचे निरीक्षक रणजीत गलांडे यांनी दिली. बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा व मलकापूर तालुक्यांत रविवारी दोन वेगवेगळ्या घटनांत चार जण वाहून गेले. यातील एकाचा मृतदेह हाती लागला, इतर तिघांचा शोध सुरू आहे.

# लेहमधील हिंसाचारामुळे लडाख पर्यटन उद्योग अडचणीत

## हॉटेल्स रिकामी... पर्यटकांना तुरुंगात डांबले, दररोज बुकिंग रद्द

**लेह लडाख :** लडाखच्या पर्यटन उद्योगाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे, हा प्रदेश आधीच अनेक संकटांशी झुंजत आहे, गेल्या आठवड्यात लेहमध्ये झालेल्या हिंसाचार आणि कर्फ्यूमुळे ते आणखी वाढले आहे. स्थानिक हॉटेल, वाहतूक आणि व्यवसाय मालकांचे म्हणणे आहे की 22 एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पर्यटकांचे आगमन आधीच कमी झाले होते आणि 24 सप्टेंबर रोजी लेहमध्ये झालेल्या संघर्ष आणि कर्फ्यूमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. हिंसाचारानंतर, लेह शहरात अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली आहे आणि मोबाईल इंटरनेट सेवा बंद करण्यात आल्या आहेत. शनिवारी चार तासांची सूट देण्यात आली, उर्वरित दिवसभर रस्ते निर्मनुष्य होते आणि सुरक्षा दल तैनात करण्यात आले होते. लेहमधील हॉटेल मॅनेजर नसीब सिंग म्हणाले की, गेल्या आठवड्यापासून पाहुणे दररोज आगाऊ बुकिंग रद्द करत आहेत. शहरात लॉकडाऊनमुळे जीवनावश्यक वस्तूंचाही तुटवडा निर्माण झाला आहे.





त्याचप्रमाणे, पर्यटक श्रुती म्हणाल्या की, आम्ही लडाखच्या टेकड्या आणि मठ पाहण्यासाठी आलो होतो, पण हॉटेलच्या खोल्यांमध्ये अडकलो आहोत. प्रत्येकजण फक्त शांततेची इच्छा करत आहे. पुढील हिंसाचार रोखण्यासाठी कर्फ्यू आवश्यक असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. तथापि, परिस्थिती लवकरच सामान्य होईल अशी आशाही ते व्यक्त करतात.

# राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी

## भाजप नेते प्रिंटू महादेवन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

**नवी दिल्ली :** लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर गोळीबार करण्याचे आवाहन करणाऱ्या टीव्ही चर्चेदरम्यान केलेल्या कथित भाष्याबद्दल केरळ पोलिसांनी सोमवारी भाजप नेते प्रिंटू महादेवन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. केरळ प्रदेश काँग्रेस समिती (केपीसीसी) सचिव श्रीकुमार सी.सी. यांच्या तक्रारीवरून पेरामंगलम पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी भाजप नेत्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 192 (दंगल घडवून आणण्याच्या उद्देशाने चिथावणी देणे), 353 (शांतता भंग करण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून अपमान करणे) आणि 351(2) (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत एफआयआर दाखल केला आहे. या विधानानंतर,



> "लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना भाजपाच्या एका प्रवक्त्याने छातीत गोळ्या घालण्याची जाहीर धमकी दिली आहे त्याचा तीव्र शब्दात धिक्कार केला. महात्मा गांधी यांच्या छातीत गोळ्या घालणारी औलाद अजून जिवंत असून हा विचार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काळ्या टोपीतून आला आहे परंतु राहुल गांधींच्या केसाला जर धक्का लावाल तर याद राखा असा इशारा काँग्रेस प्रवक्ते हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आमचे निवेदन जाहिरपणे सांगितलेले आहे. निसर्ग, नियती त्यांना सुबुद्धी देवो ही प्रार्थना करत आहे. दसऱ्याला रावणाचे दहन केले जाते ते एका व्यक्तीचे नाही तर प्रवृत्तीचे दहन असते. संघाची दहा तोंडे दहा दिशेनेच नाही तर सर्व प्रतिगामित्वामध्ये दडलेली आहेत त्याचा धिक्कार व दहन करावे अशी आमची अपेक्षा आहे, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ



**मुंबई :** राज्याततील मराठवाडा, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. नद्यांना आलेल्या महापुरामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदील झाला आहे. शेतकऱ्यांचे हातचे पीक देखील अतिवृष्टीमुळे वाया गेले आहे. राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास देखील अडचणी निर्माण होत आहेत. दरम्यान, या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारने एक महत्वाचा निर्णय घेत बारावीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास आता 20 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांना दूरध्वनीवरून संपर्क करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले होते. यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया करण्यात आली आहे. त्याचबरोबर बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखील अर्ज भरण्याची मुदत 15 ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत 10 ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे.






# धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

## बुद्ध विहार समन्वय समिती

रजी.नं .802 / 2018 व 36477/2019

समितीचे उपक्रम
एकूण 20 राज्यात संपर्क

देशातील बुध्द विहारांच्या याद्या तयार करणे. 7 राज्यात पालि भाषा परीक्षेचे 16 नोहेंबर, 2025 रोजी आयोजन. आतापर्यंत 28775 परीक्षार्थिंचा सहभाग दरवर्षी एकूण 8 परीक्षा यावर्षी 1 ते 7 परीक्षा

संपर्क :- मुख्य परीक्षा नियंत्रक
प्रा. घनश्याम धाबर्डे, मो. 9970041550
प्रा. आनंद वासनिक, मो. 9822238757

परीक्षा नियंत्रक
ए.के. पाटील, मो. 7972987584
धेनूत्तम बोंबर्डे, मो. 9561561788

लेणी संवर्धन धम्म यात्रा (सहल) आयोजन
संपर्क :- इंजि. हिरामण वाघमारे, मो. 9890181834
मोतीलाल नाईक, मो. 9422818873
सिद्धार्थ खोब्रागडे, मो. 9423122375
इंजि.धेनूत्तम बोंबर्डे

जपानी भाषा प्रशिक्षण
संपर्क :- प्रा. घनशाम धाबर्डे
इंजि. ए. के. पाटील

समन्वय म्यॅरेज ब्युरो
संपर्क :- उत्तम मेश्राम, मो.7219717508
दामोदर लोखंडे, मो. 7038902608
सिद्धार्थ खोब्रागडे, मो.9423122375

केंद्रीय कार्यकारिणी
अध्यक्ष :- अशोक सरस्वती बौद्ध, मो. 8530980741
कार्याध्यक्ष :- प्रा. घनश्याम धाबर्डे
महासचिव :- प्रा. डॉ. आनंद भालेराव, मो. 9422922668
सचिव :- ए. के. पाटील/प्रा.आनंद वासनिक/सिद्धार्थ, खोब्रागडे /दामोदर लोखंडे
कोषाध्यक्ष :- धेनूत्तम बोंबर्डे
उपाध्यक्ष :- इंजि. नरेंद्र ताकसांडे, मो. 9422922668
सुधाकर दुबे, इंजि. महेंद्र बारसागडे, प्रा. डॉ. भीमराव गोटे, अशोक बोन्दाडे
कार्यालय व्यवस्थापक
पुंडलिक गायकवाड







बहुजन सौरभ **संपादकीय**

# महाराष्ट्रातील अस्मानी संकट सरकारला थेट प्रश्न

महाराष्ट्र पुन्हा एकदा अस्मानी संकटाच्या विळख्यात सापडले आहे. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट आणि दुष्काळाच्या सर्व नैसर्गिक आपत्तींचा जबरदस्त फटका राज्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. नुकसानीचा पल्ला इतका मोठा आहे की हजारो हेक्टर क्षेत्रातील पिके उध्वस्त झाली, पशुधन मरून गेले, तर शेतकऱ्यांच्या डोळ्यातील आशेचे किरणही विझले. प्रश्न असा आहे की दरवर्षी शेतकरी हीच वेदना का भोगतो? आणि सरकार दरवेळी फक्त मदत जाहीर करण्याच्या घोषणाच का करते? सरकारच्या हवामान अंदाज यंत्रणांचा उपयोग केवळ आकडेवारी गोळा करण्यात होतो, प्रत्यक्ष शेतकऱ्याला संकटाची वेळ येण्यापूर्वी सावध करण्यामध्ये नव्हे. विमा योजना, पीक कर्जमाफी, मदत पॅकेज–ही सगळी उपाययोजना फक्त कागदावर मर्यादित राहतात. शेतकरी अर्ज करतो, पण मदत त्याच्यापर्यंत पोहोचते तोपर्यंत त्याच्या आयुष्यातील पिकाचा हंगाम संपलेला असतो. अशा उशिरा दिलेल्या मदतीला काय अर्थ आहे? याहून गंभीर म्हणजे, केंद्र आणि राज्य सरकारे केवळ परस्परांवर जबाबदारी ढकलण्यातच धन्यता मानतात. शेतकऱ्याच्या वेदनेला राजकीय कोन दिला जातो, पण त्याच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नाला ठोस उत्तर दिले जात नाही. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था यांच्या शिफारशी सरकार फाईलमध्येच ठेवते, जमिनीवर त्या उपाययोजना पोहोचत नाहीत. शेतकरी हा फक्त मतपेटीतला आकडा आहे का? निवडणुकीनंतर त्याच्या आयुष्याचे, जगण्याचे, आणि भविष्याचे प्रश्न सरकार विसरणारच का? शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या या अस्मानी संकटाला सरकारच्या निष्क्रियतेची जोड मिळते आणि तीच खरी शोकांतिका आहे. सरकारने तातडीने ठोस उपाययोजना आखाव्यात. पिक विमा खरोखरी कार्यान्वित व्हावा, नुकसानीची भरपाई त्वरित द्यावी, हवामान अंदाज तंत्रज्ञान गावपातळीपर्यंत पोहोचवावे आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार ठरणाऱ्या या उदासीन वृत्तीला पूर्णविराम द्यावा. अन्यथा, महाराष्ट्रातील अस्मानी संकट हे केवळ निसर्गाचे नव्हे, तर सरकारच्या निष्क्रियतेचे दुःखद स्मारक ठरेल. महाराष्ट्रातील शेतकरी पुन्हा एकदा अस्मानी संकटाच्या गर्तेत अडकला आहे. अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ आणि पूर–सगळे एका मागून एक घडत आहे. हजारो हेक्टरवरील पिके उध्वस्त झाली, शेतकऱ्यांचा घामाने भरलेला हंगाम मातीमोल झाला. पण सरकारची भूमिका मात्र नेहमीची–जाहिरातीतील घोषणा, मंत्र्यांचे दौरे आणि ‘लवकरच मदत होईल’ अशा पोकळ आश्वासनांवरच मर्यादित! आज सरकारसमोर काही थेट प्रश्न आहेत–पिकविमा योजना खरंच शेतकऱ्याच्या भल्यासाठी आहे की विमा कंपन्यांच्या नफ्यासाठी? कारण शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळायला महिने जातात, कधी कधी वर्षेही, पण प्रीमियम वसुली मात्र वेळेवर होते. शेतकऱ्यांचे नुकसान त्वरित भरून काढण्यासाठी ‘आपत्ती निधी’ गावपातळीवर उपलब्ध का नाही? नुकसान झालेल्या शेतकऱ्याला ताबडतोब रोख मदत मिळाली पाहिजे, पण आजही त्याला तहसील-कलेक्टरच्या उंबरठ्यावर फिरावे लागते. कृषी विभागाकडे असलेली हवामान अंदाजाची तंत्रज्ञान यंत्रणा प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत का पोहोचत नाही? जर अंदाज योग्य वेळेला आणि योग्य प्रकारे शेतकऱ्याला मिळाला असता तर त्याने पिकांचे नुकसान टाळले असते. सरकारने पीक नुकसानीचा आढावा घेण्यासाठी वैज्ञानिक आणि कृषी तज्ञांना थेट शेतात पाठवण्याऐवजी राजकीय पदाधिकाऱ्यांच्या ‘फोटोसेशन’ दौऱ्यांवर पैसे का खर्च करतात? दरवर्षी हजारो शेतकरी आत्महत्या करतात, पण सरकार अजूनही या संकटाला फक्त ‘राजकीय वादाचा मुद्दा’ म्हणून का वापरते? हे प्रश्न टाळून सरकार शेतकऱ्यांचे अश्रू पुसू शकत नाही. महाराष्ट्रातील अन्नदाता दरवर्षी निसर्गाच्या रागाला तोंड देतो, पण त्याला सरकारकडून न्याय मिळत नाही. हे सरकार शेतकऱ्याला वाचवणार आहे की फक्त मते वाचवणार आहे? महाराष्ट्रात पुन्हा एकदा अवकाळी पाऊस, गारपीट आणि दुष्काळाचा कहर झाला. लाखो हेक्टरवरील सोयाबीन, कापूस, भात, डाळींचे पिके पूर्णतः उध्वस्त झाली. शेतकऱ्याने घेतलेले कर्ज, केलेले कष्ट आणि लावलेली स्वप्ने–सगळे एका रात्रीत उद्ध्वस्त झाले. पण सरकारच्या ‘संकट व्यवस्थापन’चा चेहरा बघा–मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हेलिकॉप्टरने वरून फेरी मारतात, फोटो काढतात आणि निवेदन देतात की ‘सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे.’ सरकारला स्पष्ट सांगायला हवे–शेतकरी हा केवळ मतांसाठीचा ‘अस्सेट’ आहे की खरोखरच या राज्याचा अन्नदाता? जर शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहूनही सरकारच्या गादीला झोप येत असेल, तर हे सरकार शेतकऱ्यांचे नव्हे तर कॉर्पोरेट्सचे आहे हे मान्य करावे. आजचा शेतकरी विचारतो– ‘माझे पीक गेले, माझा संसार उद्ध्वस्त झाला, माझ्या घरातील चूल विझली, पण सरकारचा खोटा आत्मविश्वास आणि खोट्या जाहिरातींनी माझे पोट कसे भरणार?’ सरकारकडे याचं उत्तर आहे का? ■ ■

# नागराजा उसबदातचे नाशिक प्रशस्ती लेख

**नाशिक येथील लेण्यात :-** ‘सिद्धम! खहरत (क्षहरत) राजा नहपानाचा जावई, दीनीकाचा पुत्र उदार उसभदात ज्याने तीन लाख गायी दान दिल्या आहेत, ज्याने सुवर्णाचे दान देऊन बामिसा नदीवर विहाराची स्थापना केली आहे. ज्याने देवा श्रमणांना सोळा गावे दिली आहेत. जो दरवर्षी 1 लाख सिद्ध श्रमण भिक्षूंना भोजन देतो, ज्याने भारुकच्छ, दशपूर, गोवर्धन आणि सोपारिक येथे चौकोनी आरामगृहे स्थापन केली आहेत, ज्याने बाग-बगीचे, पाण्याचे हौद आणि पिण्याच्या पाण्याचे झरे निर्माण केले आहेत, ज्याने पुण्य मिळावे म्हणून इबा, पारदा, दमण, तापी, करबेणा आणि डहाणूका नदीवर प्रवाशांच्या सोयीसाठी बोटी ठेवल्या आहेत. ज्याने या नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यांवर आरामगृहे बांधली आहेत आणि पाण्याची सोय केली आहे. ज्याने चारकांच्या पिण्डीतावड, गोवर्धन, सुवर्णमुख आणि सोर्पारगाजवळील रामतीर्थ येथे भरणाऱ्या मेळ्यासाठी नानंगोतल गावात नारळांच्या 32 झाडांची किंमत म्हणून 1 हजार कार्षापण दिले आहे. त्या उसभदाताने गोवर्धन जिल्ह्याच्या तिरुन्ही (त्रिरश्मी) डोंगरावर ही लेणी आणि पाण्याचा हौद तयार केला. जो सर्वभौमाच्या आज्ञेवरून वर्षाऋतूत मालयांनी अधिपति उत्तमभद्राला घेरलेल्या वेढ्यापासून सुटका करण्यासाठी गेला आणि मालयांची मुले (सैनिक) जणू काय (माझ्या सैन्याच्या) डरकाळीने घाबरून पळाली. त्या सर्वांना उतमभद्राच्या सैन्यातर्फे कैद करवियले. नंतर मी पुष्करसला गेलो आणि तेथे 3 हजार गायी आणि 1 गाव दान दिले. वाराह गोत्राच्या बायकोचा मुलगा अश्विभूति याच्यापासून एक शेत 4 हजार (4000) कार्षापणांनी विकत घेऊन दान दिले. ते शेत माझ्या वडलांच्या मालकीच्या गावाच्या सीमेच्या वायव्येकडे आहे. त्यापासून माझ्या लेण्यामध्ये राहणारे चतुःदिशेच्या संघाचे भिक्खू आपल्या गरजा भागवतील.’ (प्रभास- सोमानाथपट्टम दसापूर - हे राजस्थानात आहे. पारदा-सुरत जिल्ह्यातील पार्डी किंवा पार नदी, बारनामा चंबळची किंवा सोन नदीला मिळणारी नदी.)

**कार्ले येथील लेण्यात :-** सिद्धम! खहरत (क्षहरत) राजा नहपानाचा जावई दीनीकाचा मुलगा उसभदात ज्याने तीन हजार गायी दिल्या, ज्याने सुवर्ण दान देऊन बानासा नदीवर विहार स्थापन केले, ज्याने देवांना आणि भिक्षुसंघाला 16 गावे दान दिली, ज्याने प्रभासच्या पवित्र तीर्थावर भिक्षुसंघाला शेती दान केले, जो आपल्या पित्यासाठी दरवर्षी 1 लाख श्रमण श्रावकांना भोजन देतो, त्याने बलूरकाच्या लेणीमध्ये वर्षावास करण्याच्या चतुःदिशेच्या सर्व भिक्खू संघाला त्याच्या निर्वाहासाठी करजिक गाव दिले आहे.’ (कार्ल्याची लेणी ज्या डोंगरावर आहेत त्याचे नाव वलूरक होते असे दिसते.) नाशिकच्या लेण्यांतील 7 आणि 8 हे दोन्ही शिलालेख जवळजवळ नष्ट झाले आहेत. त्यांचे भाषांतर करणे अशक्य आहे. ते दोन्ही लेख उसभदाताचे आहेत. सिद्धम! खहरात राजा खत्रप नहपानाचा जावई, दीनीकाचा मुलगा उसभदात याने राज्याच्या बेचाळीसाव्या वर्षी वैशाख महिन्यात त्याची लेणी चतुःदिशेच्या भिक्खू संघास दिली. शिवाय चतुःदिशेच्या भिक्खू संघाच्या चीवरांच्या आणि कुशनांच्या खर्चासाठी तीन हजार कार्षापणांची कायमची देणगी दिली आहे. हे कार्षापण गोवर्धनात राहणाऱ्या व्यापारी संघाजवळ ठेव म्हणून ठेवली आहे. विणकाम करणाऱ्यांच्या (साळ्यांच्या) एका व्यापारी संघाजवळ दोन हजार कार्षापण - शंभर कार्षापण प्रतिवर्ष व्याजाने आणि साळ्यांच्या दुसऱ्या व्यापारी संघाजवळ एक हजार कार्षापण, पंचाहत्तर कार्षापण व्याजाने ठेवले आहेत. जो व्याज देतो त्याने हे कार्षापण परत करावयाचे नाहीत. शंभर कार्षापणाच्या व्याजाने जे दोन हजार कार्षापण ठेवले आहेत, त्याच्यापासून माझ्या लेण्यामध्ये वर्षावास करणाऱ्या वीस भिक्खूपैकी प्रत्येकाला चीवरांच्या खर्चासाठी बारा देण्यात यावेत. पंचाहत्तर कार्षापण व्याजाने ठेवलेल्या एक हजार कार्षापणातून कुशनांचा खर्च भागविला जाईल. शिवाय कापूर जिल्ह्यातील चिखलपद्र गावी नारळाच्या झाडांची किंमत म्हणून आठ हजार कार्षापण दिले आहेत. हे सर्व निगमसभेमध्ये (व्यापाऱ्यांच्या सभेत) जाहीर केले आहे. रुढीप्रमाणे फलकावर लिहिले आहे. शिवाय एकेचाळीसाव्या वर्षी कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेला त्याने दान दिले आहे. उसभदाताची बायको दक्षमित्रा हिच्या दोन देणग्या नाशिकच्या लेण्यांतील शिलालेखात वाचावयास मिळतात. ‘सिद्धम! राजा खहरात खत्रप नहपानाची मुलगी दक्षमित्रा आणि दीनीकाचा मुलगा उसभदातची बायको दक्षमित्रा हिचे धम्मदान लेण्याच्या आतील खोली दान दिली आहे.’ हा शिलालेख वरच्यासारखाच आहे. (12) नाशिक नं. (10) (West no.15) अभीर राजाच्या ९व्या वर्षी. राजा ईश्वरसेनाच्या नवव्या वर्षी चौथ्या पक्षातील तेराव्या दिवशी, शक अग्निवर्मनची मुलगी गणापक रेबिलाची बायको आणि गणापक विश्ववर्मनची पुतणी उपासिका विष्णुदत्ता हिने सर्व प्राणिमात्रांच्या सुखासाठी आणि विशेषतः त्रिरश्मी पर्वतावर राहणाऱ्या भिक्खू संघातील आजारी भिक्खूंसाठी गोवर्धनातील बौद्ध व्यापारी संघाकडे, कुलरिकांच्या (कुंभाराच्या) संघाकडे एक हजार कार्षापण, देयुत्रिकांच्या (?) व्यापारी संघाकडे दोनशे कार्षापण, आणि देयूत्रिकांच्या व्यापारी संघाकडे पाचशे कार्षापण, तेल्यांच्या संघाकडे 200. या कार्षापणापैकी भिक्षु संघाचे सर्वांचे संरक्षण व्हावे या हेतूने दान केले.’ एलोरा (वेरूळ) येथील लेण्यांतील शिलालेख :- एलोरा येथील विश्वकर्मा


डॉ. एन. वी. ढोके,
मो. 9423677725





म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चैत्यगृहात बाल्कनीच्यावर बुद्धधम्मातील खालील प्रसिद्ध वाचन लिहिले आहे, ‘ये धम्मा हेतुप्पभवा । हेतु तेतां तथागतो आह । तेसं च यो निरोधी एवं वादी महासमनो ति ।’ हा लेख विश्वकर्मा चैत्यगृहात 8व्या किंवा 9व्या शतकात लिहिला गेला असला पाहिजे. एलोराच्या दुसऱ्या बौद्ध लेण्यात शिलालेख मिळत नाहीत. तीनताल लेण्यातील खांबावर काही अक्षरे न वाचता लोण्यासारखी कोरलेली आहेत. कदाचित लेणी पाहावयास येणाऱ्यांनी ती कोरली असावीत असे पुरावेत्ता भगवानलाल आणि जे. बर्जेस यांचे मत आहे. अक्षरांचा थाट चौदाव्या शतकातील दिसतो. वेल्लूर किंवा एलोरा येथे एकूण 34 लेणी आहेत. त्यापैकी 1 ते 29 बौद्ध आणि 30 ते 34 नंबरची जैन लेणी (गुफा) आहेत. बौद्ध लेणी कोरण्याचे काम सर्वात पहिल्यांदा म्हणजे ई.स. 450 च्या सुमारास सुरू झाले. 8व्या शतकातही बौद्ध लेण्यांत काही खोदकाम झाले असण्याच्या खुणा आहेत. राष्ट्रकुटांच्या कृष्णराजाने स्वतःला शुभतुंग आणि अकालवर्ष अशी नावे धारण करून ई.स. 753 ते 775 मध्ये मराठवाड्यातील मालखेड येथून राज्य केले. त्यानेच वेरुळ येथील जगप्रसिद्ध कैलास लेणे खोदवून घेतले. त्याच्या शेजारचेच 17 नंबरचे ‘दशावतार’ नाव असलेल्या बौद्ध लेण्याचे रुपांतर हिंदू लेण्यात केले गेले आहे. राष्ट्रकूटांच्या नंतरच्या राजांच्या काळात वेरूळ येथील जैन लेणी कोरली गेली. या जैन लेण्यांतील शिल्प अत्यंत सुंदर आहे. वेरुळ येथील बौद्ध लेणी आणि अजंठा येथील काही लेण्यांच्या खोदकामाचा काळ काही अंशी एकच असला, तरी वेरुळ आणि अजंठा येथील लेण्यांतील शिल्पात बराच फरक आहे. वेरुळ येथील लेण्यातील भिंतीवर सर्रास अनेक बौद्ध मूर्ती कोरलेल्या पाहावयास मिळतात. तसेच दारवाज्याच्या बाहेर दोन्ही बाजूस भव्य आकाराच्या बोधिसत्वाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. बोधिसत्वांच्या समवेत बहुतेक ठिकाणी शक्ती, तारा, भृकुती यांच्या आणि इतर मूर्ती कोरलेल्या आहेत. वेरुळ येथील 10 नंबरचे चैत्य लेणी ‘विश्वकर्मा’ या नावाने प्रसिद्ध आहे. त्या लेण्याच्या मूळच्या कोरीव कामात इतका बदल केला गेला आहे की मूळ स्वरूपात ते लेण्या कश्या होत्या हे समजणे कठीण आहे. या लेण्याच्या प्रवेशद्वाराच्या कमानीचे डिझाइन इतर लेण्यांमध्ये असलेल्या बोधिवृक्षाच्या पानासारखे, पण विशेष आकर्षक बनविले आहे. असे प्रवेशद्वारावरील डिझाइन भारतात इतर ठिकाणी पाहावयास मिळत नाही. वेरुळ येथील 5 नंबरचे लेणे आणि कान्हेरी येथील 10 नंबरच्या लेण्यात बरेच साम्य आहे. 11 नंबर आणि 12 नंबरची लेणी तीन मजली आहेत. त्यांच्या एकंदरीत प्लॅनवरून, बाह्य दर्शनी भागातून आणि आतील प्रशस्तपणावरून हल्लीच्या महाविद्यालयाच्या इमारतीसारखाच त्यांचा उपयोग होत असावा हे अनुमान काढता येते. अजंठा, एलोरा आणि कान्हेरी येथे निश्चितपणे बौद्ध विद्यालये असली पाहिजेत.

वेरुळ येथील काही लेण्यांना धेडवाडा आणि दुसऱ्या काही लेण्यांना महारवाडा असे नाव आहे. ‘धेड’ हा शब्द थेर या शब्दाचा अपभ्रंश आहे. ‘धेडवाडा’ आणि ‘महारवाडा’ ही बौद्ध लेण्यांना दिलेली नावे बौद्धांच्या विषयी वाटणाऱ्या द्वेषामुळे ब्राह्मणांनी दिली नसून ती धार्मिक इतिहासातील सामाजिक स्थित्यंतराचा एक दुवा (टोपननाव) आहेत. हल्लीचे धेड आणि महार, हे पूर्वी बौद्ध होते, याचा तो एक पुरावा आहे. बौद्धांच्या पडत्या काळात ब्राह्मणांनी टाकलेल्या सामाजिक आणि आर्थिक बहिष्कारामुळे धेडांची आणि महारांची पुढे दयनीय स्थिती झाली. त्यांचे ग्रंथ नष्ट केल्यामुळे, त्यांना शिक्षण घेण्यास मनाई केल्यामुळे आणि त्यांच्यावर लादलेल्या आर्थिक गुलामगिरीमुळे, ते आपला भूतकाळ विसरले. वेरुळच्या लेण्यांसमोरच वज्रेश्वरीचे मंदिर आहे. तेथे मूळच्या बौद्ध शाखा वज्रयानियांचा विहार आणि चैत्य असावा.

**तेर (महार) टेकडी :-** पुरा. उत्खनन ई.स. 1968 मधे पुरावेत्ता मोरेश्वर गंगाधर दीक्षित नि सिद्ध केले कि इथे मौर्यपूर्वकालीन स्तूप होता. आत 8 आरे आणि बाहेरून 16 आरे पक्या ईटाचा चक्र सापडला. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण द्वारावर चबुतरे निर्मित आहेत. तिथे पुलुमावी सतकर्णीचे नाणी (सिक्के) प्राप्त झाले, जे लालपूर संग्रहालयात सुरक्षित प्रदर्शनार्थ आहेत. तेर शब्द हा थेर शब्दावरून आला आहे. अंध युगात याला धेड उच्चारण प्राप्त झाले. यावरून हे सिद्ध होते कि महार लोकांचे पूर्वज बौद्ध नीतिमत्ता निर्वहक होते. त्यांचा सातवाहनाशी निकट संबंध आहे. संदर्भ : महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, पृ. 96, 151, 152, 169 - मा. शं. मोरे. ■ ■




# राजा ढाले यांचे धम्म चळवळीतले योगदान

**भारताच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात अनेक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांनी आपला ठसा उमटवला आहे. त्यात राजा ढाले हे नाव विशेषत्वाने घेण्यात येते. कारण त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची मशाल हातात घेतली आणि धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण केला. समाजव्यवस्थेत शतकानुशतके पसरलेल्या जात-अन्याय, विषमता आणि अमानवीय परंपरांविरुद्ध उभे राहण्याचे साहस दाखवणाऱ्या काही थोर व्यक्तींमध्ये राजा ढाले हे नाव सदैव अग्रक्रमाने घेतले जाईल. ते केवळ एक विचारवंत, लेखक, कवी किंवा पत्रकार नव्हते; तर ते समाजमनाला हादरे देणारे, आत्मसन्मानाची जाज्वल्य जाणीव करुन देणारे आणि डॉ. बाबासाहेबांच्या धम्म चळवळीचे प्रखर वाहक होते.**

जातिव्यवस्था ही भारतीय समाजाच्या विकासाला लागलेली गंज आहे. या व्यवस्थेविरुद्ध बोलण्याचे धाडस प्रत्येकाला होत नाही. पण राजा ढाले यांनी आपल्या लेखणीतून आणि संघर्षातून हा आवाज बुलंद केला. राजा ढाले यांनी 1972 मध्ये स्थापन झालेल्या दलित पँथर संघटनेच्या माध्यमातून वंचित समाजाला हक्क आणि स्वाभिमानाची नवी भाषा दिली व चळवळ उभारून त्यांनी शोषित समाजात आत्मसन्मानाची ठिणगी पेटवली. तेव्हा ते तरुण होते; पण त्यांच्यातील प्रखर अस्मिता, जाज्वल्य आत्मसन्मान आणि अढळ धैर्याने संपूर्ण समाजात जागृती निर्माण केली. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला संदेश की ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवला.

राजा ढाले यांना नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रेरणास्थान होते. आंबेडकरांनी दाखवलेला समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा मार्ग त्यांनी आयुष्यभर आपल्या कार्यातून जपला. ढाले यांच्यासाठी बुद्धांचे धम्म म्हणजे केवळ धार्मिक आचार नव्हता, तर तो सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांचा लढा होता. राजा ढाले यांचे लेखन व भाषणांतून नेहमीच धम्म मार्गाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी बुद्धांच्या करुणा, समता आणि मैत्रीच्या तत्त्वज्ञानाला सामाजिक क्रांतीचे अधिष्ठान मानले. त्यांचा ठाम विश्वास होता की खऱ्या अर्थाने मनुष्याची मुक्ती फक्त धम्माच्या मार्गानेच शक्य आहे. म्हणूनच त्यांनी आयुष्यभर जातिभेद, अंधश्रद्धा, असमानता याविरुद्ध आवाज उठवला आणि समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा झेंडा उंचावला. पत्रकार, लेखक, विचारवंत म्हणून ढाले यांचे योगदान विलक्षण होते. त्यांनी सत्य मांडताना कधीही घाबरले नाही. त्यांच्या शब्दांत धार होती, त्यांच्या भूमिकेत ठामपणा होता. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, अंधश्रद्धा फोडणे आणि दुर्बलांच्या हक्कांसाठी झगडणे हेच त्यांचे जीवनकार्य ठरले. राजा ढाले यांचे आयुष्य म्हणजे संघर्षाचा प्रवास होता. ते संघर्ष फक्त वैयक्तिक नव्हता, तर लाखो-करोडो दलित, शोषित, पीडितांसाठी होता. त्यांच्या अस्तित्वामुळे अनेकांना स्वतःच्या माणुसकीची किंमत कळली. अन्याय, अपमान, भेदभाव यांना न घाबरता लढणे म्हणजे काय, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. ढाले यांनी धम्म चळवळीला केवळ परंपरा म्हणून न जपत, तर एक जीवंत क्रांती म्हणून पुढे नेले. त्यांनी दाखवले की बुद्धांचा धम्म हा फक्त पूजाघरातला विषय नाही, तर तो समाज परिवर्तनाचे अधिष्ठान आहे. धम्म चळवळ ही केवळ बौद्ध धर्माची परंपरा नाही, तर ती सामाजिक परिवर्तनाची लढाई आहे.

या लढाईला दिशा देणारे राजा ढाले होते. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी नवी धार दिली, त्यात क्रांतिकारकता आणली. त्यांच्या कार्यामुळे धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्या विचारांनी असंख्य तरुणांना प्रेरणा दिली आणि धम्माच्या मार्गाकडे वळवले. आज राजा ढाले आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष आणि त्यांची ओजस्वी परंपरा आपल्याला सतत मार्गदर्शक ठरेल. धम्म चळवळीतला त्यांचा ठसा कायमचा अविस्मरणीय आहे. त्यांनी दाखवलेला आत्मसन्मानाचा मार्ग आणि डॉ. बाबासाहेबांच्या तत्त्वांचा वारसा पुढे नेणे हीच खरी त्यांना दिलेली श्रद्धांजली ठरेल. समता, न्याय आणि धम्माचा संदेश जगभर पोहोचवणाऱ्या थोर विचारवंत राजा ढाले यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! ■ ■




प्रविण बागडे
मो. 9923620919


# देशाची दिशाहीन वाटचाल अभ्यासक आणि विश्लेषक

गोलमेज परिषदा, अनेक ब्रिटिश कमिशनापुढे साक्ष देऊन त्यांनी ब्रिटिशांना व विरोधकांना आपली मागणी पटवून दिली. स्वबळावर यशस्वी झाले. देश स्वतंत्र झाल्याने दुर्बुद्धीच्या भट-ब्राम्हणांना स्वतःचे खच्चीकरण वाटले. सामाजिक विरोधासाठी त्यांनी बहुजनांचे खच्चीकरण केले. त्यासाठी रास्वंसे संघाची स्थापना केली. आयते स्वतंत्र भारत ताब्यात घेतले. पण देशात निर्माणात्मक नाविन्यपूर्ण कधी करून दाखविल्याचा भटांचा इतिहास नाही. देशातील बुद्ध प्रतिमा, बौद्ध शिल्पे, स्तूप, काही विहारांचे विकतीकरण केले. काहींना हिंदू शिल्प करून उष्टे खाण्यात पुरुषार्थ दाखवला. बुद्धाचा महाबोधी महाविहार ताब्यात घेण्यास स्वाभिमान समजणाऱ्या भट-ब्राम्हणाने जगात देशाची नाचक्की केली. भटांसोबत हिंदू शंकराचार्य, पुरोहित, संत, पुजारी, यांना उष्टे खाण्यात धन्यता कां वाटली? एवढ्याने मन भरले नसल्याने कानपूरच्या बुद्धपार्कचे नाव बदलून शीवपार्क करण्याचे उत्तर प्रदेश सरकारचे कारस्थान चालू झाले. पुन्हा तेच उष्टे खाणे. इसपू. 3 ऱ्या शतकातील जमिनीत गडलेले अनेक बौद्ध पुरावे ब्रिटिशांनी शोधले, बाहेर काढले. भारताचा दैदिप्यमान इतिहास जगासमोर आणला. त्यापैकी हिंदूंनी अनेकांना विकृत केले. तरीही अनेक बौद्ध पुरावे उत्खननाची वाट पाहतात. जगाला दिशा दर्शक ठरणाऱ्या त्या शिल्पाकडे भारत सरकारने दुर्लक्ष केला. प्रचंड विषमतेत समता, समानता प्रस्थापित होणारे स्वतंत्र भारताचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केले. राष्ट्रीय प्रवाहात सर्व भारतीयांना येण्यासाठी संविधानात आरक्षणाची तरतूद केली. भट- ब्राम्हणानी याचा कट्टर विरोध केला. डॉ. बाबासाहेब बुद्धाशिवाय कोणापुढेही वाकले नाही. त्यांनी समाजात सामाजिक




जाणीव जनरेट केली. समतेच्या संविधानाने भटांचा अहंकार दुखावला. भटांनी संविधान मान्य केला नाही. त्यांनी स्वातंत्र्य, तिरंगा, स्वातंत्र्याची प्रतिके मान्य केली नाही. त्यांनी संविधानाचे सार्वजनिक दहन करून राष्ट्रद्रोह. देशद्रोह केला. त्यांनी देशात अर्बन दहशतवाद, आतिरेक निर्माण केला. मनुस्मृती लागू करण्याचा प्रचार-प्रसार सुरू केला. हिंदू-मुस्लिम वाद पेटवला. ‘हिंदू खतरेमे आया’ असा गाजावाजा सुरु केला. जेव्हा की देशाची सता त्यांच्याच हातात आहे भटांनी हिंदूंना फसवले. न्यूज नेटवर्कने प्रकाशित केल्याप्रमाणे देशाच्या लोकसंखेत भट-ब्राम्हणांची संख्या 3.5 ते 4 टक्के असतांना ते लोकसभेत त्यांचे खासदार 80टक्के, राज्यसभेत 96टक्के, राज्यपाल 50टक्के, कॅबिनेट सचिव 33टक्के, मंत्र्यांचे सचिव 34, अतिरिक्त सचिव 62टक्के, पर्सनल सचिव 70टक्के, विद्यापीठात 91टक्के, सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश 96टक्के, उच्च न्यायालयात न्यायाधीश 80टक्के आहेत. 4टक्के असणारा भट-ब्राम्हण समाज (1000100+4) = 2500टक्के आरक्षण घेतो (न्हावी, धोबी, सुतार, लोहार वगैरेना धंद्याचा टॅक्स भरावा लागतो. पुजारी, पुरोहिताला करावयाचा धंद्याचा टॅक्स भरावा लागत नाही) राजदूत 81टक्के, बँकेत 57टक्के, आयएएस 72टक्के आयपीएस 67टक्के, टीव्ही कलाकार 83टक्के, मिडियात 90टक्के, सरकारी नोकरीत 72टक्के, मंदिर पुजारी 100टक्के, तरी भट- ब्राम्हण आरक्षणाने देश बुडाल्याचा प्रचार करतो व बहुजन त्यावर मान हलवतो. बिनडोक कोण? हिंदू धर्मावलंबी धर्म परिवर्तन करतात. परधर्मीय हिंदू होत नाही, कां? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पारदर्शकतेने याचे उत्तर स्वाभिमान या एका शब्दात दिले ते किती हिंदूनी समजून घेतले? भारताच्या सर्वोच्च पदावर विराजमान राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू आदिवासी असल्याने त्यांना राम मंदिरापासून दूर ठेवल्या गेले. आदिवासीना त्या रामाचे महत्व का वाटावे? दलित अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नव्हता. आता ते अस्पृश्य राहिले नाही. ते हिंदू मंदिराकडे अथवा त्यांच्या देवाकडे ढुंकूनही पाहात नाही. त्यांना मंदिर प्रवेशाची गरज नाही. याची लाज कां वाटत नाही? संसद भवन उद्घाटनापासून राष्ट्रपतींना दूर ठेवल्या गेले. बहुजन समाजाच्या प्रधानमंत्र्याना प्रोटोकाल कळला नाही. देशाची प्रतिष्ठा मलिन केली तसा इतिहास कोरला गेला. कोरोना हटावसाठी सरकारी आदेशाने यंत्र युगात देशाने ‘खुल जा सिम सिम’सारख्या थाळ्या पिटल्या. त्यापूर्वी अख्या देशाने सरकारी आदेशाने दगडाच्या गणपतीला दूध पाजले. जगात यामुळे देशाची प्रतिष्ठा वाढली का? संगणक आल्याने चीन, जपान, अमेरिका, इंग्लंडनी कामाच्या योजनात बदल केला. कर्मचारी कमी झाले नाही. भारत देशात संगणक आल्याने नव्या योजनांच्या अभावात खर्कन कर्मचारी कपात झाली. देशातील विद्वान प्रदेशात जागा शोधायला लागले. देशात राहिले ते धर्मांधतेत पंगू झाले. अन्नदाता शेतकऱ्यानी माय-बाप सरकारसमोर मागण्या मांडल्या. सरकारने त्यांना देशाचा शत्रू समजून त्यांच्या मार्गात लोखंडी खिळे ठोकून मार्ग अवरुद्ध केला. हा सरकारचा दर्जा की सरकारची नाचक्की?

क्रमशः ■ ■

**विद्या व्यासंग**




प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064


# जनगणनेत जाती, जमाती, ओबीसी प्रवर्ग व धर्मांतरीत बौद्धांनी सद्सद्विवेक बुद्धिचा वापर करावा!

**भारतात दर दहा वर्षांनी जनगणना होत असते आणि ही जगातील सर्वात मोठी प्रशासकीय प्रक्रिया मानली जाते. जनगणनेमध्ये संपूर्ण लोकसंख्या, घरांची माहिती आणि त्याच्या मुख्य वैशिष्ट्यांची माहिती गोळा केली जाते. भारताची सर्वात पहिली जनगणना लॉड मेयो यांच्या राजवटीत 1872 साली केली. सन 2011 पर्यंत भारताची 15 वेळ जनगणना झाली आहे.**

**जनगणना म्हणजे काय?**

सर्वप्रथम जनगणना म्हणजे काय? जनगणना कशासाठी होत असते हे समजून घेणे महत्वाचे आहे. तर कुट्यात किती व्यक्ती आहेत, स्त्री/पुरुष, वय, शिक्षण, व्यवसाय, आणि आपल्या राहत्या घरासंबंधी, घराच्या संरचनेसंबंधी (सिमेंट क्रांक्रेट, कवलाचे, टीनाच्या पत्राचे, ताडपत्रीचे) माहिती आरोग्याबाबत व इतर माहिती, जनगणनेत नोंदविल्या जातात. तसेच धर्म, संवर्ग व जात या बद्दलही माहिती गोळा जाते. या माहितीशी आपला काही वैयक्तिक, कौटुंबिक संबंध असतो काय? ही सर्व माहिती कोणासाठी आणि कशासाठी हे समजून घेणे गरजेचे आहे. जनगणनेत कोणतेही प्रमाणपत्र वा पुरावा पत्र सादर करण्याची गरज नाही.

**जनगणनेचे महत्त्व :-** भारतीय जनगणनेत भारतीय लोकसंख्येच्या आधारे विविध धर्माचे, संवर्गाचे, जातीचे किती स्त्री/पुरूष आहेत याची गणना होते आणि या जनगणनेतील संख्येच्या माहितीच्या आधारे केंद्रशासन जनगणनेतील अधिकृत आकड्यांच्या/संख्येच्या आधारे सरकारच्या सर्व योजना विविध घटकांसाठी आखल्या जातात. मग त्यामध्ये अस्पृश्य गणल्या गेलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्यायाअंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असो की, विविध विकास कामासाठी अंदाजपत्रकात तरतूदी असो. जनगणनेच्या माध्यमातुन शिक्षण, व्यवसाय, आर्थिक सुबत्ता, आरोग्य, राहणीमान इत्यादीतून भारत देश विकसीत, विकसनशील वा अविकसित आहे याचा अनुमान काढता येतो. भारतीय जनगणनेचा वैयक्तिक स्तरावर वा कौटुंबिक स्तरावर कोणताही संबंध नसतो. फक्त शासन दरबारी योजना राबविण्याकरिता या अधिकृत आकड्यांचा उपयोग केला जातो.बौद्धधम्मीयांनी मार्च, 2027 मध्ये होणाऱ्या जनगणनेत धर्म, जातीचा प्रवर्ग, जात व भाषा काय लिहावी या संबंधाने असल्याने ही जनगणना आपल्या सर्वांसाठी दुरगामी दृष्टिकोनातून फार महत्वाची आहे. कारण भारतीय जनगणनेत सर्व बौद्ध, धर्माच्या रकान्यात धर्म बौद्ध लिहणारच आहेत. पण जातीचा संवर्ग व जातीच्या रकान्यात काय लिहावे या संबंधी दोन मत प्रवाह वा संभ्रम आहे. किंबहुना अशी शंका येते की, प्रस्थापितांनी आपल्या समाजातील काही धुरीनींना पकडुन आपल्यात संभ्रम पसरविण्याच्या प्रयत्नात तर नाही ना अशी शंका आहे.

**मत प्रवाह :-** सर्वप्रथम मार्च, 2027 ला होणाऱ्या जनगणना प्रश्नाच्या संबंधाने सर्व बौद्धांनी भारतीय जनगणनेत धर्म-बौद्ध लिहल्यानंतर जातीचा प्रवर्ग अनुसूचित जाती व जात महार किंवा जी असेल ती लिहावी. बौद्ध असुनही जातीचा प्रवर्ग व जात लिहायला सांगतात, तेव्हा विरोधी मत असलेले व्यक्ति त्यावर आक्षेप घेत काही प्रश्न उपस्थित करतात. त्यात - 1) बुद्ध धम्मात जात नाही. मग तुम्ही जात का लिहायला सांगता. 2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती निर्मुलनाचा लढा उभारला. 3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 साली स्वतः धम्म दिक्षा घेतली व आपल्या अनुयायांना धम्म दीक्षा दिल्यानंतर भारत बौद्धमय करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर उपप्रश्नामध्ये आता आरक्षण राहिलच कुठे असे चार प्रश्न विचारून स्वाभीमानाची गोष्ट करतात व या आधारेच धर्माच्या रकान्यात धर्म-बौद्ध लिहल्यानंतर जातीचा संवर्ग व जातीच्या रकान्यात निरंक अशी त्यांची मनोभूमीका आहे. तत्वतः चारही प्रश्न योग्य व मान्य आहेत. परंतु, सद्यःस्थिती बघता आपल्याला भावनिक न होता व्यावहारीक होणे गरजेचे आहे. आधीच सांगितल्याप्रमाणे जनगणना कशासाठी हे समजून घेणे गरजेचे आहे. जनगणनेमध्ये आपण दिलेल्या माहितीचा वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर कोणताही संबंध नाही. वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर ही माहिती गुप्त असते. आपण जनगणनेमध्ये भरलेली माहिती कोणी आरटीआयमध्ये सुद्धा मागु शकत नाही किंवा त्याला ती मिळु शकत नाही.

**बौद्ध जनगणनेत वाढ :-** जनगणनेमध्ये बुद्ध धम्मीयांची संख्या वाढविण्यासाठी आपण सर्व धर्माच्या रकान्यात बौद्ध लिहणार आहोत. कारण आपल्या देशात या बुद्धाच्या भूमीत आज देखील करोडोच्या संख्येने बुद्ध धम्मीय राहतात. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावरील संघटन निर्मिती करिता यांची नोंद घेतली पाहिजे. जेणेकरून याची नोंद आंतरराष्ट्रीयस्तरावर बौद्ध राष्ट्र घेतील.

क्रमशः ■ ■





सुधीर चालखुरे
मो. 9767908405

# वर्तमानात बौद्धांची आर्थिक स्थिती आणि सहकारातून नव्या दिशा

**महाराष्ट्रातील नवबौद्धांचा विचार केल्यास, गेल्या शंभर - दीडशे वर्षांचा इतिहास लक्षात घेतल्यास असे निदर्शनास येते की नवबौद्ध किंवा पूर्वाश्रमीचे महार यांचा अर्थार्जनाचा मार्ग म्हणजे बिगारी, वेठबिगारी, रोजंदारी, मोलमजुरी, स्वच्छतेची कामे इत्यादी मार्गातून होत असे. या वर्गाकडे हिंदू धर्मियातील इतर मागासलेले घटक जसे, लोहार, सुतार, कुंभार, कुणबी, तेली, यांचे सारखे पिढीजात कुशलतेचे व्यवसाय नव्हते, किंवा त्यांना चातुर्वर्णाच्या नियमाप्रमाणे व्यवसाय करण्याची मुभा नव्हती. या कारणास्तव नवबौद्ध किंवा महारांना मोलमजुरी, नोकरी - चाकरी हाच मुख्य मार्ग अर्थार्जनाचा होता.**




कालांतराने विषमता शिथिल होत गेली, समता प्रस्थापित होण्यासाठी नवीन कायद्यांची तरतूद झाली आणि शिक्षणाचा मार्ग अवलंबून बौद्ध समाज मोठ्या प्रमाणात नोकरदार झाला व त्यातून आर्थिक दृष्ट्या सुस्थित आला असे निदर्शनास येते. 21 व्या शतकातील बदलत्या परिस्थितीत व जीवघेण्या प्रतिस्पर्धेच्या युगात जास्तीत जास्त कसब असलेले व्यावसायिक शिक्षण व skillful baground च्या माध्यमातून, खाजगीकरणाच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या, औद्योगिक संस्था व बौद्धिक विद्वत्तेचा विस्तार या माध्यमातून नोकऱ्या व व्यवसाय मिळवून आपली आर्थिक परिस्थिती सुदृढ करण्याची पराकाष्ठा सुरू आहे. येणारा काळ हा जागतिक स्तरावर अत्यंत स्पर्धात्मक होणार आहे. मोठे भांडवलदार किंवा बहुराष्ट्रीय कंपन्या प्रचंड भांडवल लाऊन मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतात व स्वस्त वस्तू तयार करून कमी किंमतीत बाजारात आणतात, त्यामुळे छोटे व्यावसायिक, गृहउद्योग, परंपरागत छोटे उद्योजग जास्त तग धरू शकत नाहीत आणि आपोआपच सामान्य जनता पुन्हा खाजगी नोकरीच्या जोखडात अडकवली जाते. अशा वातावरणात लहान सहान उद्योजक किंवा उत्पादक यांना टिकून राहणे कठीण झाले आहे आणि पर्यायाने छोटे उद्योग किंवा व्यवसाय करणेही अवघड होईल. परंतु अशाही परिस्थितीत उच्च, तांत्रिक व कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून विविध आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून जागतिक स्तरावरील नव्या संशोधनाचा आधार घेऊन लघु व मध्यम उद्योजकतेकडे वळणे गरजेचे वाटते. या संबंधाने एक सूर असाही ऐकिवात आहे की बौद्धांनी आपले आर्थिक गट तयार करावेत. जेणेकरून इतर समाजाप्रमाणे जसे मारवाडी, सिंधी, गुजराती, पंजाबी अशा समाज घटकांमध्ये प्रचलित असलेली, आपल्याच व्यक्तीची आर्थिक स्थिती सुदृढ करण्यासाठी जास्तीत जास्त वाणिज्यक व्यवहार आपसात करावे (ज्याला आपण समाजांतर्गत आर्थिक व वाणिज्यिक व्यवहार म्हणू.) व इतर प्रस्थापित व्यावसायिकांकडे जाणारा पैसा हा समाजांतर्गत व्यवसाइंकाकडे फिरवून आर्थिक मजबुती प्रदान करता येईल. सद्यः परिस्थितीचा मागोवा घेतल्यास असे निदर्शनास येते की बौद्ध समाज मोठ्या प्रमाणावर उच्चशिक्षित होऊन भारताबाहेर परदेशात स्थिर स्थावर झाला आहे आणि बऱ्यापैकी आर्थिक दृष्ट्या प्रगत झाला आहे. त्याचप्रमाणे देशांतर्गत असलेल्या समाजातील सरकारी, निमसरकारी, बँक्स, मोठ्या खाजगी संस्था, इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नोकरीत आहे, अशा सर्व लोकांना एका सूत्रात जोडून समाजातील वंचित वर्गाला आर्थिक सुदृढ करण्याचे मार्ग, सहकारी औद्योगिक व्यवसाय, सहकार क्षेत्रातील विविध सरकारी योजना इत्यादींचा लाभ घेत आर्थिक हालचाली करण्यासाठी प्रयत्न करणे. समाजातील अशिक्षित, अर्धशिक्षित, अल्पशिक्षित मोलमजुरी किंवा अंगावरची कामे करणाऱ्या घटकाला छोटे व्यवसाय व उद्योगधंदे उभारून देणे, त्याचे व्यवस्थापन करणे, त्यांना फायद्याचे उत्पन्न मिळवून देत पर्यंत मागोवा घेणे व पाठबळ पुरवणे अशा प्रकारचे प्रयत्न करणे अपेक्षित आहे. निःसंशय या सर्व कल्पना प्रत्यक्षात उतरवणे ही दीर्घ कालावधी लागणारे, क्लिष्ट व अवघड कार्य आहे पण अशक्य नाही. अर्थातच भविष्यातील 25 वर्षांचा विचार करून सातत्य ठेवून तशी यंत्रणा उभारणे हे मोठ्या संयमाचे व जिकिरीचे आहे, पण अशक्य नाही.एक विचार आणखी प्रत्यक्षात आणता आल्यास असेही करता येईल की जो बौद्ध समाजातील शेतकरी ग्रामीण भागात स्थायी झालेला आहे, त्यांचे शेतातला माल शहरातील लोकांनी बाजार भावाने घेण्याची साखळी निर्माण करता येऊ शकेल, जेणेकरून त्यांचे ठोक बाजारात होणारे आर्थिक शोषण थांबवता येईल व त्यांना आर्थिक दृष्ट्या सबळ करता येईल. ग्रामीण भागात राहणारा शेतकरी किंवा कामकरी यांच्याकरिता जोडधंदे उपलब्ध करून देणे हेही त्याअंतर्गत येऊ शकेल. बौद्ध समाजाचे सहकार क्षेत्राकडे अजूनही पाहिजे तसे लक्ष नसल्याचे आढळून येते.

महाराष्ट्र राज्यापुरता विचार केल्यास या राज्यात बौद्ध/नवबौद्धांची संख्या लक्षणीय आहे. सहकार क्षेत्रातील विविध उपक्रम जसे, सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, दुग्ध व्यवसाय, सहकारी शेती, बँक्स, सोसायटी, वाहतूक अशा प्रकारच्या उपक्रमांची सुरवात करून मोठ्या संख्येने लोकांना अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध करून देता येतील. पश्चिम किंवा उत्तर महाराष्ट्रातील मराठा आणि मुस्लिम समाजाने सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर जम बसवला आहे. त्याच धर्तीवर विदर्भ - मराठवाडा भागात बहुसंख्येने असलेल्या बौद्ध समाजाने या क्षेत्रातून आपला आर्थिक विकास घडवून आणला पाहिजे. अर्थातच या सर्व बाबी पूर्णत्वास नेण्याकरिता, विश्वास, पैसा, चिकाटी, धैर्य आणि वेळ ह्या सर्व गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यातल्या या समाजाकडे आप-आपसातील विश्वासार्हतेवर प्रश्न चिन्ह आहेत. त्यातून मोठे गैरसमजही आढळतात. औद्योगिक अजाणतेपण व संयम या गोष्टींच्या अभावी कुठलेही नवे उपक्रम चिरकाल टिकण्यास अडथळे येतात. पण अशाही परिस्थित नवे मार्ग सुरू करणे किंवा चालवणे हे येणाऱ्या पुढच्या पिढ्यांसाठी दुरगामी परिणाम देणारे उपक्रम ठरू शकतील, असा आशावाद ठेवून प्रयत्न करणे इष्ट होईल. ■ ■



अनिल नगरारे
मो. 9422106414

# महाबोधी महाविहार मुक्तीच्या लढ्याचा मार्ग




खरे तर या विषयावर आणि यावरून होणाऱ्या आंदोलनांवर आजपर्यंत अनेक विचारवंतांनी विविध वर्तमानपत्रात लेख लिहून बौद्ध समाजाला जागृत करण्याचे काम केले आहे. तरीही आपण लिहावे, असा काही बौद्ध धम्मीयांसह इतर धर्मीयांचाही आग्रह होता, म्हणून मी हा लेख लिहीत आहे. बांधवांनो, महाबोधी महाविहार हे सम्राट अशोक राजाने इ. स. पूर्व 3 ऱ्या शतकात बांधले असल्याचे दाखले इतिहासात आहेत. त्यानंतर या विहाराची डागडुजी ब्रह्मदेशाच्या तत्कालीन राजांनी अनेकदा केली. इंग्रजांच्या काळात सुद्धा त्यांच्या परवानगीने ही डागडूजी करण्यात आली. तेंव्हा पुढे इंग्रजांनी त्यांच्या राजवटीत 1811 मध्ये फ्रान्सिस बुचानिन या इतिहास तज्ज्ञाची नेमणूक करून बिहार प्रदेशातील बुद्ध गया येथील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचे सर्वेक्षण केले. त्यांनी इंग्रज सरकारला अहवाल सादर केला. बुचानन यांचा अहवाल खुप बोलका आहे तो असा की, 1) गीरी व शैव महंतांनी बोधगया येथील महाविहारावर केलेले अतिक्रमण अयोग्य आहे. 2) या परिसरात सर्वत्र बुद्ध अवशेष आढळल्याची नोंद. 3) महाविहाराची दुरूस्ती करावी व हे महाविहार जतन करावे. 4) महाबोधी महाविहाराच्या भोवतीचे बांधकाम पाडून महंतांच्या मठाचे बांधकाम करण्यात आल्याचे गंभीर निरिक्षण बुचानन यांनी नोंदवले आहे. यावरून बुद्धगया जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी जॉर्ज ग्रिएर्सन यांनी महंतांना चोरी न करण्याची सक्त ताकीद दिली. बुचानन यांच्या महत्वपूर्ण अहवालानंतर 1847 मध्ये बुद्धगयेचे महत्व इंग्रजांना अधोरेखित झाले आणि त्यांनी प्रख्यात पुरातत्वीय संशोधक कॅप्टन मार्खाम किट्टो यांच्या मार्गदर्शनाखाली बुद्ध गया परिसरात उत्खनन सुरू केले. यात अनेक बुद्ध मूर्त्या, शिल्पे ई. आढळून आले. पुढे 1861 मध्ये बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक सर अलेक्झांडर कनिंघम यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर मीड यांनी उत्खनन सुरू केले. पुढे 1874 मध्ये ब्रम्हदेशाचे राजे मिंडान मीन यांनी इंग्रजांची परवानगी घेऊन या विहाराची दुरूस्ती करायला सुरुवात केली. त्याठिकाणी भिक्खूंना राहण्यासाठी विहार बांधले. इंग्रजांनी हे काम विहाराच्या मूळ स्वरूपाचे जतन करणारे नसल्याचे कारण देत थांबवले. त्यानंतर जे. डी. बेगलर या आधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. त्यांनी बारकाईने येथील अभ्यास करून महाविहाराचा जिर्णोद्धार केला. महाविहार परिसरात अतिक्रमण केलेल्या गीरी, शैव महंतांनी या संशोधनाला, सर्वेक्षणाला या कालावधीत विरोध केला नाही. किंवा कुठलाही आक्षेप नोंदवला नाही. सर्वेक्षण थांबवले नाही. की जिर्णोद्धाराला विरोधही केला नाही. आडकाठी निर्माण केली नाही. या महाबोधी महाविहारावर, परिसरावर, येथील वास्तूंवर आमचाच हक्क, आधिकार असल्याचा दावा पण केला नाही. पुढे 1886 साली एडवीन अर्नाल्ड जे लंडन स्थित टेलिग्राफ वृत्तपत्राचे संपादक होते त्यांनी या महाविहारास भेट दिली. त्यानंतर त्यांनी जगभरातील बौद्ध भिक्खू, विद्वान, संशोधक, दार्शनिक, अभ्यासक ई. ना या स्थळाची माहिती दिली. त्यावरून 1891 साली श्रीलंकेहून भन्ते अनागारिक धम्मपाल बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार येथे आले आणि त्यांनी या विहाराच्या स्वतंत्रतेसाठी आपले जीवन पनाला लावले. त्यांचा असा आग्रह होता की, 1) भारत देशाने आपला सर्वश्रेष्ठ पुत्र बुद्धाची अमरवाणी ऐकावी. 2) महाबोधी जिथे बुद्धाने बुद्धत्व ज्ञान प्राप्त केले, ते बुद्ध गया महाविहार बौद्धांच्या हाती सोपवावे. 3) त्यासाठी त्यांनी दिर्घकाळ शांततेच्या मार्गाने सातत्याने लढा उभा केला. 4) जगभरातील बौद्ध राष्ट्रांशी चर्चा केल्या. 5) महाबोधी सभा आणि महाबोधी नावाची पत्रिका काढली. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, बिहार सरकारने 1949 साली बौद्ध गया महाबोधी महाविहारा संदर्भात कायदा पास केला. त्याद्वारे मंदिर व्यवस्थापनासाठी सरकारने एक समिती नेमली. खरे तर या कायद्यातील मंदिर या शब्दावर तेंव्हा जोरदार आक्षेप घेऊन त्याजागी विहार असा शब्दप्रयोग करायला हवा होता. परंतू तसे झालेले दिसत नाही. कारण महाबोधी महाविहार हे 'मंदिर' नसून 'विहार' आहे. मंदिर आणि विहार शब्दात जमीन असमानाचा फरक आहे. तसेच या कायद्यात विहारातील बुद्ध मूर्तीचाही उल्लेख करायला हवा होता. पण तो ही झाल्याचे दिसत नाही. या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून हिंदू जिल्हाधिकाऱ्यासह चार सदस्य हिंदू आणि चार सदस्य बौद्ध असे सदस्य आहेत. म्हणजे इथेही मनुवाद्यांनी समितीत स्वतःचे बहुमत ठेवून त्यांच्या मनातील चोरी प्रकट केली. हा बौद्ध धम्मीयांप्रती मनुवादी हिंदूंचा अविश्वासच आहे. बिहार कायदा बनवणाऱ्या मनुवादी हिंदूंनी आपल्या हिन मनोवृत्तीचा परिचय येथेही करून दिला आहे. एकाच हिंदू धर्मात असून सुद्धा हिंदू मंदिरावर शैव बहुमताला अधिकार दिला जात नाही, तर मग असा न्याय इथे महाबोधी महाविहार संदर्भात लागू का नाही? जर तुम्ही बौद्धांना हिंदू मानता, तर मग हा भेदभाव का? आणि जर मानत नाहीत, तर मग इतर धर्मियांच्या धार्मिक स्थळांवर हस्तक्षेप करण्याचा तुम्हाला काय आधिकार आहे? जर हिंदूचा अवतार या नात्याने महाबोधी महाविहारावर तुम्ही आधिकार गाजवत आहात, तर हा अवतारवाद खोटा आहे. फसवा आहे. कारण बुद्धासाठी आजवर कोण्या वैदिक ब्राह्मणांनी, हिंदूंनी देशात प्रदेशात आजवर एक ही विहार बांधलेले नाही. उलट ते देशभरातील बुद्ध मूर्त्यांना शेंदूर फासून झाकून ठेवून, डोळे मोठे भेसूर लाऊन, साडी नेसवून, डोक्यावर टोप ठेवून विहारांना खोटे नाव देऊन त्यांची मूळ ओळख पुसण्याचेच काम आजवर करीत आले आहेत. यावरून अवतार एक चकवा आहे, खोटे आहे हेच सिद्ध होतेय. म्हणजे बुद्ध हा विष्णूचा अवतार नाही. हा खोडसाळपणा आहे. तरी ही तुम्ही बुद्ध विहाराच्या ठिकाणी पिंडदान, पुजा अर्चा नैवेद्य ई. करतात ती बौद्ध धम्मीयांसाठी आपत्ती आहे. पुढे 2013 मध्ये या कायद्यात दुरूस्ती करून बिगर हिंदू जिल्हाधिकारी अध्यक्ष म्हणून काम बघतील. खरे तर 15 ऑगस्ट 1947 रोजी अस्तित्वात असलेल्या सर्व प्रार्थनास्थळांचे धार्मिक स्वरूप अबाधित ठेवणारा कायदा हा प्रार्थना स्थल (विशेष तरतूदी) अधिनियम 1991 असा असताना, या कायद्यानुसार 15 ऑगस्ट 1947 रोजी देशातील कोणत्याही प्रार्थना स्थळाची ओळख तेंव्हा जशी होती तशीच कायम ठेवली जाईल, असे नमूद असताना सुद्धा हा बिहार बोधगया मंदिर कायदा आजही मागे का घेण्यात येत नाही? काय हे 1991 च्या कायद्याचे उल्लंघन नाही? तर निश्चितच आहे. या कायद्याने हिंदू आणि बौद्धांमधे सामायीक व्यवस्थापन सुरू केले, हीच मोठी चूक केली. कारण हे महाबोधी महाविहार आहे. मंदिर नाही. आजवर टप्प्याटप्प्यावरील विविध आंदोलनांद्वारे 1) महाबोधी महाविहार स्वतंत्र करा. 2) बौद्धांना धार्मिक स्वातंत्र्य मिळालेच पाहीजे. 3) विहारावर संपूर्ण नियंत्रण बौद्धांचे असलेच पाहीजे. 4) बिहारचा 1949 चा कायदा रद्द करा ई. मागण्यांसाठी उपोषणे, धरणे, निवेदन, स्वाक्षरी मोहीम, पदयात्रा, मोर्चे, निदर्शने, चर्चा, संवाद होत आहेत. तरीही गीरी शैव हिंदू विहारावरील अतिक्रमण सोडायला तयार नाहीत. इथे यांच्या मनातील खोटे लक्षात येते. बुद्ध गया येथील महाबोधी महाविहारासह देशभरातील तमाम बौद्ध वैभवं, ग्रंथ, विरासत, बुद्ध तत्वज्ञान, इतिहास, लेण्या, स्तूपे, विहारे ई. मिळवण्यासाठी बौद्धांची आंदोलनात्मक ओळख वाढवावी लागणार आहे. याची सुरुवात म्हणून महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात येण्यासाठी भारतीय बौद्धांनी चिन, जपान, श्रीलंका, भूतान, थायलंड, इंडोनेशिया, ब्रह्मदेश, कोरिया, मलेशिया ई. बौद्ध राष्ट्रांशी बोलने, चर्चा, संवाद, देवाणघेवाण सुरू ठेवली पाहीजे. 2) बुद्ध गयाला एशियाचे बुद्ध सांस्कृतिक आणि धार्मिक केंद्र बनवण्यास पुढाकार घेतला पाहीजे. 3) या देशांचे भारतासोबत मानवतेचे घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले पाहीजेत. 4) तेथील बौद्ध भिक्खू, थेरो, महाथेरो, विद्वान, दार्शनिक, संशोधक, अभ्यासकांना भारतात निमंत्रीत केले पाहीजे. 5) त्यांनी ही बुद्धाचा भारत देश म्हणजे आमचा देश आणि आम्ही ही ते आमचे आहेत, असे समजावे. असा सद्भाव बौद्धांनी आपसात निर्माण करून बौद्ध धार्मिक, सांस्कृतिक संबंध बळकट केले पाहीजेत. त्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 पासून देशातील तमाम बौद्ध बांधवांना दिलेली बौद्ध दिक्षा आणि बावीस प्रतिज्ञांचे तंतोतंत पालन केले पाहीजे. बौद्धांनी आचरणातून आपली ओळख बौद्ध अशीच दाखवली पाहीजे आणि हिंदू धर्मातील आचार, विचार, चाली, रिती, रूढी, परंपरा, सण, वार, नवस, सायास, उपवास, कंदूरी, देव, देवी, मंदिर पुजा ई. चा त्याग केला पाहीजे आणि आमची ओळख बौद्ध धम्मीय अशीच वाढवली पाहीजे. आधी आम्ही शंभर टक्के बौद्ध होऊनच, हे महाबोधी महाविहार स्वतंत्र करू शकतो. यावर ठाम विश्वास पाहीजे. अर्धे हिंदू महार आणि अर्धे बौद्ध राहून हा लढा पूर्णत्वाकडे जाईल काय? यावर विचार झाला पाहीजे. बौद्ध भिक्खूंनीही आपले लक्ष विविध घरगुती, सामाजिक कार्यक्रमांवर केंद्रीत न ठेवता आणि मी यासाठीच भिक्खू आहे, असा भाव मनात न बाळगता जगाच्या कपाळावर भारत भूमीतील बुद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानाचा आणि आचरणाचा टोप ठेवण्यास पुढाकार घेतला पाहीजे आणि देशभरातील बौद्ध विहारे, लेण्या, स्तुपं, शिल्प ई. विरासतीवर ब्राह्मणांनी जो कब्जा केलेला आहे, ती सर्व बौद्ध विरासत परत मिळवून घेण्यासाठी केंद्र सरकारने आणि त्या त्या राज्यातील सरकारांनी पुढाकार घेऊन ब्राह्मणांचे बौद्धवैभवांवरील अतिक्रमण तात्काळ काढले पाहीजे. त्यासाठी सर्व बौद्ध बांधवांनी आधी बौद्ध बनणे आणि मग बौद्ध बनून एकवटून प्राणपणाने शेवटच्या श्वासापर्यंत शांततेत लोकशाही मार्गाने लढणे, हाच त्यावरचा मार्ग असू शकतो. ■ ■



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

# जातीआधारित आरक्षण संपवा म्हणणाऱ्या भामट्यांनो...!

संविधानात आरक्षणाचे तत्व आले कसे, हे ऊच्चवर्णीय सत्ताधारी वर्गाने आणि जातीआधारित आरक्षण संपवा म्हणणाऱ्या अज्ञानी भामट्यांनी नीट समजून घेतले पाहिजे. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारत हा एकसंध राष्ट्र नव्हता. वेगवेगळ्या संस्थानांचे व इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारलेल्या प्रदेशांचा तो मेळ होता. सामाजिक स्तरावर मात्र चातुर्वर्ण्य व्यवस्था कार्यरत होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी वर्णव्यवस्था होती. आजचे एससी-एसटी हे अवर्ण असल्याने अस्पृश्य मानले जात; त्यांना गावकुसाबाहेर किंवा डोंगरकपारीत राहावे लागत असे. वर्णानुसार अधिकार व व्यवसाय ठरलेले होते. शिक्षण घेण्याचा व ज्ञान देण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता. संत तुकाराम महाराजांची गाथा इंद्रायणी नदीत बुडवली गेली कारण ते शूद्र होते. महात्मा जोतिबा फुले व सत्यशोधकांना धार्मिक विधी करण्याचा अधिकार नाही, म्हणून ब्राह्मणांनी इंग्रजांच्या कोर्टात खटले दाखल केले. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक नाकारला गेला. कारण 'शूद्राला राजा होण्याचा अधिकार नाही' अशी ब्राह्मणी मांडणी होती. म्हणजेच गावकुसात राहणाऱ्या 54टक्के शूद्र-ओबीसी समाजाला संपत्ती संचयाचा, सन्मानाचा, अधिकारांचा हक्क नव्हता. त्यांना फक्त ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्यांची सेवा करण्याचे बंधन होते. 15टक्के मुठभर सवर्णांचे हित साधणारी ही व्यवस्था होती. याच अन्यायकारक विषमतेला झुगारून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वांवर भारतीय संविधान उभे राहिले.




**आरक्षण का आले?** :- भारतीय संविधानात आरक्षण हे सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणण्यात आले. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी नाही. ज्या दिवशी जातीवरून भेदभाव थांबेल, जाती पाहून लग्न ठरवणे, पुजारी नेमणे, नोकरी-इंटरव्ह्यूत गुणकपात करणे बंद होईल. न्यायालयात, संसदेत, सचिवालयात, मीडियामध्ये सर्व जातींचे समप्रमाणात प्रतिनिधित्व दिसेल, त्या दिवशी आरक्षणाची गरजच उरणार नाही.

**संविधानसभा आणि आंबेडकरांचा वाटा** :- भारतीय संविधान सभेत 299 सदस्य होते. अध्यक्ष होते डॉ. राजेंद्र प्रसाद. बहुसंख्य सवर्ण व काँग्रेसवाले असूनही, व्यापक चर्चेनंतरच प्रत्येक कलम मंजूर केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घरबसल्या संविधान लिहिले नाही; तर सर्व सभासदांच्या मंजुरीने जातीआधारित आरक्षण हा ठराव संविधानात आला.

**आजची परिस्थिती** :- 75 वर्षे उलटली, तरी प्रश्न तोच आहे. सामाजिक समता प्रस्थापित झाली का? आजही ड्रेनेजमध्ये उतरून मरतात ते बहुजन समाजातील भंगी-वाल्मिकी कामगारच; सवर्ण किती आहेत, आकडे जाहीर करा! मजुरी, उसतोड, खाणी, बांधकाम या कष्टप्रद कामांमध्ये ब्राह्मण-बनिया-राजपूत-मारवाडी किती मजूर आहेत? आकडे द्या! दरवर्षी सफाई काम करताना किती जणांचा जीव जातो? पिढ्यानपिढ्या घाण ओढणाऱ्या समाजाला शिक्षण-नोकरीत वाटा हवा, तो त्यांचा हक्क आहे; तुमच्या वाट्याचा नाही.

**खरी लाज कुणाची?** :- जेव्हा 1-2टक्के मागास समाज आर्थिकदृष्ट्या उभा राहतो तेव्हा तुमच्या पोटात दुखते. ही मानसिक विकृती नाही का? ही विद्वेषी भावना नाही का? सामाजिक समता नको असेल तर तुम्ही स्पष्टपणे मान्य करा की तुम्ही संविधानविरोधी, मानवताविरोधी, राष्ट्रविरोधी विषमतावादी आहात.

**शेवटचा इशारा** :- महात्मा फुले-सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे बी पेरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संवैधानिक खतपाणी घातले. आता जागरूकता वाढत आहे. तुम्ही फक्त 15टक्के आहात. सामाजिक भेदभाव खपवून घेतला जाणार नाही. विद्वेषी मानसिकता ठेचून काढली जाईल. सामाजिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय जातीआधारित आरक्षण संपणार नाही. हे समजून घ्या. ■ ■

**- भास्कर भोजने**

# एन. शिवराज-आंबेडकरी चळवळीतील अग्रणी नेतृत्व

हे भाषण त्यांच्या क्रांतिकारी विचारांचे, दलित स्वाभिमानाच्या जाणिवेचे आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यासाठी त्यांच्या दृढ निश्चयाचे प्रतीक होते, ज्याने त्यांच्या चळवळीला बौद्धिक आणि भावनिक आधार दिला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूल्यमापन** :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिवराज यांच्याबद्दल म्हटले होते की, 'राव बहादूर एन. शिवराज यांनी आमच्या लोकांच्या हक्कांसाठी दीर्घ काळ परिश्रम, समर्पण, आणि निःस्वार्थ वृत्तीने काम केले आहे. त्यांनी केंद्रीय विधानसभेत आमच्या लोकांचे प्रतिनिधित्व केले आहे आणि त्यांच्या प्रयत्नांनी आमच्या हक्कांना कायदेशीर आणि राजकीय आधार मिळाला. त्यांचे शिक्षण आणि योग्यता याबाबत त्यांच्यासारखे फार कमी लोक आहेत. ते बी.ए., बी.एल. (मद्रास विद्यापीठ) आहेत, त्यांनी वकिली केली आहे आणि 10 वर्षांपेक्षा जास्त काळ मद्रासमध्ये कायद्याचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते, ज्यामुळे त्यांनी अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली.' हे वाक्य शिवराजांच्या बौद्धिक, व्यावसायिक आणि सामाजिक नेतृत्वाला मान्यता देते, तसेच त्यांच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमधील ऐतिहासिक सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करते. शिवराज आणि डॉ. बाबासाहेब यांच्यातील सहकार्य शेकाफेच्या स्थापनेद्वारे, शेड्यूल्ड क्लासेसच्या हक्कांसाठी केलेल्या संयुक्त प्रयत्नांमध्ये आणि 1946 मध्ये कॅबिनेट मिशनच्या अन्यायाविरुद्ध लढ्यात दिसून येते. या एकतेने दलित चळवळीला एक नवीन शक्ती आणि दिशा मिळाली. शिवराजांचे जवाहरलाल




नेहरूंसोबतचे संबंध जटिल आणि वैचारिक मतभेदांनी भरलेले होते. त्यांनी मद्रासचे महापौर असताना लोक स्टेडियम बांधला, जो 1946 मध्ये पूर्ण झाला आणि 1993 मध्ये पुनर्बांधनी झाल्यावर नेहरूंच्या नावाने नामांकित झाला, जे त्यांच्या दूरदर्शी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. मात्र, 1946 मध्ये काँग्रेसने शेड्यूल्ड क्लासेसना स्वतंत्र राजकीय ओळख नाकारल्यावर त्यांनी नेहरूंच्या आणि काँग्रेसच्या धोरणांविरुद्ध निषेध दर्शवला. 25 ऑगस्ट 1946 रोजी पुण्यात त्यांनी 'दिवाण बहादूर' या पदवीचा त्याग केला, जो त्यांच्या सत्याग्रही स्वभावाचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक न्यायाच्या बांधिलकीचा द्योतक आहे. हा निषेध त्यांच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकतेचा आणि दलित समुदायाच्या हक्कांसाठी लढण्याच्या दृढ निश्चयाचा पुरावा होता, ज्याने त्यांच्या चळवळीला नैतिक आणि वैचारिक बळ मिळाले.

**निष्कर्ष आणि वारसा** :- एन. शिवराज यांचे सामाजिक आणि राजकीय योगदान तामिळनाडूतील दलित चळवळीला आणि राष्ट्रीय पातळीवर शेड्यूल्ड क्लासेसच्या उत्थानाला दिशा देणारे आणि दीर्घकालीन ठरले. त्यांनी डॉ. आंबेडकरांबरोबर काम करून शेकाफे आणि आरपीआयसारख्या संस्थांना बळकटी दिली, ज्यामुळे दलितांना राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक सक्षमता मिळाली. त्यांचे शिक्षण, वकिली आणि नेतृत्वकौशल्यांनी त्यांना एक प्रभावी, प्रज्ञावान आणि जनसंपर्क साधणारे नेते बनवले. त्यांच्या पत्नी अन्नाई मीनांबाल यांच्यासह त्यांनी दलित महिला सशक्तीकरणाला चालना दिली, ज्याने चळवळीला स्त्री-पुरुष समानतेचा आणि सर्वसमावेशक आयाम दिला. त्यांचे 'जय भीम' साप्ताहिक, मंदिर प्रवेश आंदोलन आणि स्टेडियम बांधकामासारखे उपक्रम त्यांच्या दूरदर्शी दृष्टिकोनाचे प्रतीक आहेत. शिवराजांचे जीवन हे डॉ. आंबेडकरांच्या वारशाचे एक जिवंत, अजरामर आणि प्रेरणादायी प्रतीक आहे, ज्याने सामाजिक न्याय, समता, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याच्या लढाईत तामिळनाडूला, दक्षिण भारताला आणि संपूर्ण भारताला प्रेरणा दिली. त्यांचा वारसा आजही दलित सशक्तीकरण, सामाजिक समानता आणि मानवी हक्कांच्या चळवळीत जिवंत आणि प्रभावी आहे, ज्याने पिढ्यानपिढ्या प्रेरित होत राहतील. या प्रभावी व कणखर नेतृत्वास विनम्र अभिवादन! ■ ■



भीमराव सरवदे,
मो. 9405466441

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्वप्न साकारणार




डिसेंबर 1955 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर औरंगाबादला आजारी अवस्थेत होते. त्यावेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितले की - 'मी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा एक नवा राजकीय पक्ष काढण्याचा विचार करीत आहे. भारतीय राज्यघटना खऱ्या अर्थाने राबविण्यासाठी हा पक्ष असेल. समानता, स्वातंत्र्य व बंधुता हेच त्याचे ध्येय असेल. भारतातील सर्व लहानसहान पक्षांचे एकीकरण करून, अमेरिकन धर्तीवर हा पक्ष चालविला जाईल.' (खंड 20, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, पान 437) याप्रमाणे ठरविल्यानुसार, 30 सप्टेंबर 1956 रोजी दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणी सभेत डॉ. बाबासाहेबांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) ची स्थापना केली.

**सुरुवातीचे प्रयत्न** :- सन 1957 च्या लोकसभा निवडणुकीसाठी आरपीआयला औपचारिक मान्यता मिळविण्याचा प्रयत्न झाला. परंतु 66 दिवसांनी डॉ. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर अहमदनगर येथे राजाभाऊ खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन निवडणूक लढण्याचा प्रयत्न झाला. परंतु नव्या पक्षाचा संदेश देशभर पोहोचायला वेळ लागणार असल्याने, अखेरीस शेड्युल्ड कास्ट फेडरेशनने संयुक्त महाराष्ट्र समितीसोबत गठबंधन करून निवडणूक लढली. 1957 च्या निवडणुकीत महाराष्ट्रातून 6 खासदार, तर गुजरात, म्हैसूर व मद्रासमधून प्रत्येकी एक खासदार निवडून आले.

**आरपीआयची औपचारिक नोंदणी** :- 3 ऑक्टोबर 1957 रोजी यशवंत आंबेडकर, एन. शिवराज, पी.टी. बोराडे, दादासाहेब रुपवते आदी सात मान्यवरांनी आरपीआयची औपचारिक नोंदणी करण्याचा निर्णय घेतला. 10 मार्च 1959 रोजी पक्षाला नोंदणी क्रमांक 191 मिळाला. 1960-63 या काळात महानगरपालिकांच्या निवडणुकांत आरपीआयला मोठे यश मिळाले. मुंबई, नागपूर व मद्रासचे महापौर या पक्षाचे झाले.

**लोकसभा निवडणुकांतील प्रवास**

1962 : एन. शिवराज अध्यक्ष असताना 10 राज्यात 68 उमेदवार. तीन खासदार निवडून आले.

1964 : शिवराज यांच्या निधनानंतर दादासाहेब गायकवाड अध्यक्ष झाले.

1967 : 70 उमेदवार उभे केले, पण फक्त रामजी राम (उत्तरप्रदेश) खासदार झाले.

1971 : निवृत्ती कांबळे (महाराष्ट्र) खासदार झाले.

1975 : रा. सू. गवई अध्यक्ष. 1977 ते 2004 दरम्यान अनेक निवडणुका लढल्या, पण एकाही खासदाराचे यश नाही.

1998 : मात्र या वर्षी महाराष्ट्रातील 4 उमेदवार विजयी झाले - रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे, प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर आणि रा. सू. गवई. हा आरपीआयचा सर्वाधिक यशस्वी क्षण ठरला.

**स्वप्न साकार मंच**

**पुढील घडामोडी**

2006 मध्ये रा. सू. गवई राज्यपाल झाल्यानंतर अध्यक्षपद ॲड. एस. राजेंद्रन यांच्याकडे गेले. त्यांच्या नेतृत्वात 2009, 2014, 2019 आणि 2024 च्या निवडणुकांत आरपीआयला एकही खासदार मिळाला नाही. आरपीआयचे रजिस्ट्रेशन मात्र डॉ. राजेंद्र गवई (सरचिटणीस) यांनी कायम ठेवले. नुकत्याच केंद्र सरकारने 334 पक्षांची नोंदणी रद्द केली, परंतु आरपीआय टिकून राहिला. ही आंबेडकरी जनतेसाठी महत्त्वाची बाब आहे.

**वर्तमान स्थिती आणि 2029 ची दिशा** :- आज भारतात आरपीआयला 69 वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत पक्षाचे फक्त 4 खासदार निवडून आले. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला गठबंधनाचा सल्ला अनेक नेत्यांनी न ऐकल्याने, आंबेडकरी व अल्पसंख्याक समाजाचे राजकीय सामर्थ्य विखुरले गेले. 2014 व 2019 प्रमाणेच 2024 मध्येही मायावती आणि बाळासाहेब आंबेडकर यांना जनतेने मतदानात मोठी घट केली. कारण त्यांनी गठबंधनाऐवजी स्वतंत्र लढा दिला. त्यामुळे अप्रत्यक्षपणे बीजेपी सत्तेत आली. जर 2029 मध्येही हाच मार्ग धरला तर परिस्थिती पुन्हा रिपीट होईल. पण जर डॉ. बाबासाहेबांचा सल्ला मानून काँग्रेस व समविचारी पक्षांसोबत गठबंधन झाले, तर राज्यसभेत व विधानसभा पातळीवर बीजेपीचे संख्याबळ कमी होईल आणि ते संविधान बदलण्याच्या षडयंत्रात यशस्वी होणार नाहीत.

**अमेरिकन धडा आणि भारतीय संदर्भ**

1854 मध्ये अमेरिकेत स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाने अब्राहम लिंकनसारखा नेता दिला. 1865 मध्ये गुलामगिरी नष्ट करणारी ऐतिहासिक दुरुस्ती झाली आणि अमेरिकेचा प्रवास सुपर पॉवरकडे सुरू झाला. भारताला जर सुपर पॉवर व्हायचे असेल तर जातीय-धार्मिक भांडण विसरून टॅलेंट व इनोव्हेशन या दोन आधारस्तंभांवर उभे राहणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेबांनी 30 सप्टेंबर 1956 रोजी स्थापन केलेली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ही केवळ एक राजकीय पक्ष नव्हे, तर भारतीय संविधानाच्या रक्षणासाठीची चळवळ आहे. आजच्या काळात आंबेडकरी, अल्पसंख्यांक व समाजवादी शक्तींनी एकत्र येऊन, गठबंधनाच्या मार्गानेच पुढे गेले पाहिजे. तेव्हाच डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न आणि भारताच्या लोकशाहीचे भविष्य सुरक्षित राहील. ■ ■



रमाईचे स्वप्न - २१३

## शालतरु शक्य बुद्ध विहार

गुजवाडी, शनीचरा, इमामवाडा रोड, नागपूर. या परिसरातील श्रमिकांच्या अर्थ बळावर विहार निर्माण झाले आहे. वंदना सह बावीस प्रतिज्ञा वाचन सह पौर्णिमा, वर्षावास कार्यक्रम होतात. विहार मेन रोडवर असून परिसरातील लोकांचा सक्रीय लोकवर्गणीतून बांधले आहे. वेन कोंडाग्य भिक्खू यांचे वास्तव्य आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिपुरा राज्यातील विद्यार्थी राहतात.

संवाद मित्र, विनोद आटे
मो.9373218081

# बीएस 4 चे 2 ऑक्टोबरला नागपुरात राष्ट्रीय पथसंचलन व गणसभा

**नागपूर :** दि. 2 ऑक्टोबर 2025 ला अशोका धम्म विजयादशमी दिनी भारतीय संविधान, सन्मान सुरक्षा आणि संवर्धन (बीएस 4) अभियान अंतर्गत नागपूरात पथसंचलन व गणसभेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी 4.00 वाजता संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पथसंचलन सुरु होणार असून समारोप संविधान मैदान (इंदोरा मैदान) येथे होणार आहे. पथ संचलनानंतर सायंकाळी 6.00 वाजता गणसभेला सुरुवात होईल. या गण सभेला मुख्य अतिथी शीतल करकाम (गोंडवाना मुक्ती सेना, नागपूर), विशेष अतिथी डॉ. के. एस. चौहान (वरिष्ठ अधिवक्ता, सुप्रीम कोर्ट, दिल्ली), प्रा. डॉ. विकास जांभुळकर (फुले - आंबेडकरवादी विचारवंत, नागपूर) मान्यवर वक्ते 'राष्ट्रीयकरण पासून ते राज्य समाजवादापर्यंत' या विषयावर मार्गदर्शन करतील. सदर गण सभेची अध्यक्षता बामसेफचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. आर. एल. ध्रुव करतील.




राष्ट्रीय संविधान पथ संचलन ही एक व्यापक जनसंपर्क मोहीम आहे आणि सार्वजनिक संवादाचे माध्यम आहे. तशीच ती जनचळवळीच्या वाढत्या प्रभावाची वार्षिक घोषणा सुद्धा आहे. ही प्रतीशील सभ्यता आणि कलेचा एक नवीन आयाम आहे. अशोक धम्म विजयादशमीच्या निमित्ताने, लोकशाहीच्या वारशाचा आणि प्रगतीच्या नवीन आणि प्रगत मार्गाचा स्पष्ट संदेश येथून राष्ट्राला दिला जाईल आणि कळवला जाईल. या वर्षी, बीएस-4 अभियान कार्यक्रमांतर्गत, देशभरातील 1,000 निवडक संविधान प्रबोधक उपस्थित राहतील. तसेच बीएस 4 अभियान अंतर्गत 'राष्ट्रीयकरणाचा अजेंडा' घेऊन नागपूरच्या ऐतिहासिक 'संविधान चौक'पासून इंदोरा मैदान (संविधान मैदान) पर्यंत त्यांच्या संघटित आणि शिस्तबद्ध मोर्चाचे नेतृत्व करतील.

या कार्यक्रमाचे प्राथमिक उद्दिष्ट सामान्य जनतेपर्यंत या विषयाची व्याप्ती, महत्व आणि प्रासंगिकता पोहोचवणे आहे. म्हणून, सामाजिक क्रांतीच्या या चळवळीत भारतीय नागरिकांनी पथ संचलनात व गण सभेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन बामसेफचे राष्ट्रीय संघटन सचिव संजय मोहिते यांनी केले आहे.

# नागार्जुना अभियांत्रिकी महाविद्यालयात विप्रो कंपनीचा प्लेसमेंट ड्राइव्ह

**नागपूर :** नागपूर येथील नागार्जुना इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (हुडकेश्वर) मध्ये नामांकित आयटी कंपनी विप्रो लिमिटेडचा भव्य प्लेसमेंट ड्राइव्ह नुकताच संपन्न झाला. या उपक्रमात विदर्भातील विविध महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाल्या असून विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला.

उत्कृष्ट कामगिरी व कौशल्यावर आधारित झालेल्या या प्लेसमेंट प्रक्रियेत 60 हून अधिक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विप्रोच्या मान्यवर अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची तांत्रिक मुलाखत, गटचर्चा व वैयक्तिक मुलाखतीद्वारे निवड केली.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरलीधर रहांगडाले यांनी सांगितले की, 'या प्लेसमेंट ड्राइव्हद्वारे आमच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील कंपनीत प्रवेश मिळवला, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांचे भविष्यातील यश निश्चितच महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे प्रतीक ठरेल.'

विप्रो कंपनीचे प्रतिनिधी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची तांत्रिक तयारी, संवाद कौशल्य आणि सॉफ्ट स्किल्सचे विशेष कौतुक केले.

समस्त विभाग प्रमुख, प्लेसमेंट अधिकारी आणि सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी मैत्रेय शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष अजय वाघमारे, सचिव प्रदीप नगराळे व कोषाध्यक्ष कुलदीप रामटेके यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या यशस्वी प्लेसमेंट ड्राइव्हमुळे हुडकेश्वर महाविद्यालयाचा शैक्षणिक व औद्योगिक विश्वात दर वाढला असून भविष्यातही अशाच मोठ्या कंपन्यांचे प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्याचा निर्धार संस्थेने केला आहे.

# आंबेडकरवाद न स्वीकारल्यामुळे अस्पृश्य जाती विकासापासून वंचित : डॉ. राजेंद्र कांबळे

**चंद्रपूर :** बॅ. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी महोत्सव गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि डॉ. आंबेडकर कॉलेज चंद्रपूर द्वारा दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन चंद्रपूर येथे करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे यांच्या हस्ते झाले. तर प्रसिद्ध विचारवंत ज. वी. पवार, पद्मश्री सुखदेव थोरात, संस्थेचे अध्यक्ष अरुण गोटेकर, दिल्ली युनिव्हर्सिटीचे डॉ. अजित कुमार, श्रीनिवास खांदेवाले, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



याप्रसंगी इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर येथील कार्यकारी प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे यांनी 'भारतीय समाजातील वंचित गटासाठी संविधानिक संरक्षण' या विषयावर आपले व्याख्यान दिले. ते म्हणाले की ज्या जातीने आंबेडकरवाद स्वीकारला नाही त्या जाती विकासापासून वंचित राहिल्यात जसे की कर्नाटकातील माला जात, तामिळनाडूतील परैया, उत्तर प्रदेशातील जाटव व चर्मकार, पंजाब मधील रामदासी चमार, महाराष्ट्रातील महार या जातींनी आंबेडकरवाद स्वीकारल्यामुळे त्या जातींचा विकास झाला आणि त्या शिक्षणात अग्रेसर ठरल्या. परंतु अनेक जाती आंबेडकरवादापासून दूर राहिल्याने त्यांचा विकास होऊ शकला नाही. महाराष्ट्रात अनुसूचित जाती मधील महारजातींनी धर्मांतर केल्यामुळे त्यांचा विकास झाला. परंतु अनुसूचित जाती अंतर्गत उपवर्गीकरणाची मागणी करण्यात अग्रेसर असलेल्या मातंग जातिचे केवळ 1.44टक्के लोक धर्मांतरित झाले. त्यामुळे ते विकासापासून वंचित राहिलेत. परंतु या अविकसिततेचा संबंध ते आरक्षणाशी जोडतात. अनुसूचित जातीच्या एकत्रित आरक्षणामुळे आमचे आरक्षण बौद्धांनी खाल्ले. त्यामुळे आम्ही मागासलेलो राहिलो असा ते आरोप करतात, वल्गणा करतात. हे उचित नव्हे तर त्यांनी हे वास्तव स्वीकारले पाहिजे. उपवर्गीकरण करण्यासाठी त्यांनी लहुजी क्रांती सेना निर्माण केली. या सेनेद्वारा ते आंदोलन करतात. या चर्चासत्राकरिता गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखान, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे अध्ययन केंद्राच्या डॉ. शिल्पा आठवले, प्राचार्य डॉ. राजेश दहेगावकर, डॉ. मिलिंद भगत यांनी परिश्रम घेतले.



# नागपूर शहर रिपाइं स्थानिक निवडणुका स्वबळावर लढवणार 'माझे बूथ, माझी जबाबदारी' हे ब्रिदवाक्य

**नागपूर :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) नागपूर शहर शाखेची महत्त्वपूर्ण बैठक रविभवन कॉन्फरन्स हॉल, सिव्हिल लाईन येथे उत्साहात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष प्रकाश कुंभे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत ढेंगरे उपस्थित होते. नुकतेच नागपूर शहर अध्यक्षपदी निवड झालेले रवींद्र सवाईतुल व कार्याध्यक्ष क्षितीज गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीत शहर कार्यकारिणी लवकर गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर आगामी नागपूर महानगरपालिका निवडणुका स्वबळावर लढविण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला. 'माझे बूथ, माझी जबाबदारी' हे ब्रिद घेऊन पक्ष निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी शहरातील प्रभाग प्रमुख नेमणुकीबाबत चर्चा झाली. तसेच पक्ष स्थापना दिन (3 ऑक्टोबर 2025) आणि कार्यकर्ता मेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबाबत सविस्तर मंथन करण्यात आले.बैठकीच्या सुरुवातीला नव्या अध्यक्ष रवींद्र सवाईतुल व कार्याध्यक्ष क्षितीज गायकवाड यांच्या निवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.

# संघरत्न बुद्ध विहारात प्रशिक आनंद यांचे व्याख्यान



**नागपूर :** वर्षावास निमित्ताने व्याख्यान मालिका संघरत्न विहारांमध्ये सुरू करण्यात आलेली आहे. व्याख्यान क्र. 12 संघरत्न विहारात घेण्यात आले. व्याख्याता प्रशिक आनंद लाभले तर अध्यक्ष मधुकर गजभिये उपस्थित होते. प्रशिक आनंद आपल्या भाषणात म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला लोकशाहीचा मार्ग हा जनतेने कशा पद्धतीने हाताळायला पाहिजे व विरोधी पक्षाचे राजकारणात काम काय डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेला रिपब्लिकन पक्ष याची माहिती सुद्धा त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. तसेच बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना 25 सप्टेंबरला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या कार्यकाळाची सुद्धा माहिती प्रशिकने आपल्या धम्म प्रवचनातून दिली. मधुकर गजभिये लेखक व कवी म्हणून लाभलेत. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व्यक्त केले. ते 80 वर्षाचे असूनही आजही ते विहारा-विहारांमध्ये जाऊन स्वतः लिहिलेल्या कवितेच्या पुस्तका भेट करतात, कविता म्हणतात व समाज प्रबोधनाचे कार्य करतात. त्यांनी संविधानावर गीतसुद्धा सादर केले. सामाजिक प्रबोधन केले. त्यांनी सुंदर असे अध्यक्षीय भाषण केले. संचालन ज्योती आवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन छाया ढोक यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता निर्मला लांजेवार, शोभा खडसे, चरणदास लांजेवार, मून, सुचित्रा धनविजय, धनश्री पाटील, अंजना सुटे, माया गायकवाड, ज्योती आवळे, सविता शिरसाट, अन्नपूर्णा खांडेकर, रमा मून इत्यादींनी परिश्रम घेतले.

## महत्वाचे

### बुद्ध वचन दुःख मुक्ती करते ! विपश्यना सहआचार्य दिनेश मेश्राम



**नागपूर :** मानव समाज मोठ्या प्रमाणात एक वर्ग मिथ्या दृष्टीमध्ये पडल्यामुळे अपाय गतीला पोहचला. तो दुःखात तडफडत आहे. बुद्ध हे मानवाच्या दुःख मुक्तीचा मार्ग उपदेशित करतात. म्हणून बुद्ध वाणी मानव समाजानी आत्मसात करावी असे आवाहन बालाघाट येथील विपश्यना साधना केंद्र आचार्य दिनेश मेश्राम यांनी केले. सोनेगाव तलाव नागपूर येथील राज नालंदा बुद्ध विहारद्वारा आयोजित दोन दिवसीय सुत्त पठन कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांनी कोणते सुत्त कोणत्या प्रसंगी बुद्ध बोलले हे सांगून शुद्ध उच्चारण आणि योग्य चालीत म्हटले. त्यांचे मागे मागे उपासकानी सुत्त पठण केले. 35 उपासिका-उपासक दोन्ही दिवस सहभागी होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशीला गेडाम, इंदिरा मेश्राम, नानू हाडके, मीनाक्षी हाडके, कौसल्या धडाडे, डॉ. प्रमिला चिंचखेडे, प्रमोद मेश्राम, अशोक सरस्वती बौद्ध, जितेंद्र राऊत यांनी परिश्रम केले.

### प्रा. मा.फ. गांजरे स्मृती अनुवाद सन्मान पुरस्कार ३ ऑक्टोबरला



**नागपूर :** प्रबुद्ध अनुवाद अकादमी,3/20 विश्राम सोसायटी, राजाबाक्षा, नागपूर द्वारा दिला जाणारा यंदाचा प्रा. मा. फ. गांजरे स्मृती अनुवाद सन्मान पुरस्कार- 2025 साहित्यिक क्षेत्रात उत्कृष्ठ लिखाण आणि अनुवादाकरिता डॉ. अनिल गजभिये(इंदौर) योन 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्य शुक्रवार दि. 3 ऑक्टोबर 2025 रोजी नागपूर येथील राणी झांसी चौकातील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या उत्कर्ष सभागृहातील विशेष कार्यक्रमात दुपारी 2.00 वाजता अकादमीचे संरक्षक डॉ. के. कुसूम वियोगी(सदस्य हिन्दी साहित्य कला व संस्कृतिक भाषा विभाग, दिल्ली) यांचे शुभहस्त प्रदान करण्यात येईल असे संयोजक दिलीप पवार यांनी कळविले आहे.

### सामाजिक उत्थानासाठी सहकारी संस्थांची गरज : सच्चिदानंद दारूंडे

**नागपूर :** समाजाची आर्थिक उन्नती सहकार क्षेत्रातून शक्य आहे, एकूणच सामाजिक उत्थानासाठी सहकारी संस्थांची गरज आहे असे स्पष्ट प्रतिपादन महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे महासचिव सच्चिदानंद दारूंडे यांनी येथे केले. ते जिवक अर्बन क्रेडिट सहकारी संस्थेच्या वतीने मानवता हायस्कूलच्या सभागृहात आयोजित 30 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष सुजित डांगे होते. मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष सत्यवान गनवीर, संचालक अशोक देवगीरकर, ममता गावंडे आदी उपस्थित होते. सत्यवान गनवीर यांनी अहवाल वाचन केले. या वेळी 10वी,12वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि ज्येष्ठ नागरिक कांचा शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जितेंद्र गायकवाड, ज्ञानिवंत रामटेके, लालजी डोंगरे यांचेसह सभासद उपस्थित होते.



# टीचर्स म्युझिकल ग्रुपचा पाचवा वर्धापन दिन साजरा

**संवाद मित्र रामभाऊ डोंगरे, नागपूर :** संगीत हे श्रोत्यांसाठी किंवा गायकांसाठी पूजनीय आहे. या असीम प्रेमाची भावना व्यक्त करण्यासाठी संगीतप्रेमी करीता या स्मरणीय सुगम संगीताचा कार्यक्रम टीचर्स म्युझिकल ग्रुपद्वारा सीताबर्डी, नागपूर येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या अपर्ण हॉलमध्ये तीन टप्प्यात पार पडला. नागपूर शहर, ग्रामीण व इतर जिल्हे येथील प्रतिभासंपन्न कलाकारांनी यात आपला सहभाग नोंदविला होता. एकाहून एक अश्या श्रवणीय गीतांच्या प्रस्तुतीने रसिक मंत्रमुग्ध झाले होते. हा पुरस्कार वितरण सोहळा शिक्षक आमदार, सुधाकर अडबाले यांच्या हस्ते पार पडला. यात सहभागी कलाकारांसह काही निवडक संगीत संयोजकांचा सुद्धा सत्कार करण्यात आला होता. निवेदन रीना पुरी यांनी केले होते. तर इतर दोन दिवशी रोहित वाघ व सविता रेलकर यांनी केले. आभार प्रदर्शन माधुरी हुमणे यांचे होते. टीचर्स म्युझिकल ग्रुपचे अध्यक्ष प्रमोद अंधारे यांच्या मार्गदर्शनात गठित समितीमध्ये संकल्पना, डॉ. अरविंद काळे यांची होती, तर सल्लागार डॉ. सुशील गडेकर होते. सचिव प्रा. राजू देशपांडे, कोषाध्यक्ष अल्का लाडे, कार्याध्यक्ष, डॉ. धनंजय वेळूकर, उपाध्यक्ष, नितीन भोळे, श्याम डहाके, सहसचिव, प्रा. खुशाल कोडापे, राजेंद्र नांदुरकर स्वागत समितीमधे माधुरी हुमणे, हेमलता सलामे, प्रा. संजीव सराफ, राजेश धुंदाड तर संगीत संयोजन प्रवीण भिवगडे यांचे होते. या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# कवितेच्या घरातर्फे बापुरावजी पेटकर काव्यसंग्रह पुरस्कार वितरण सोहळा व पुस्तक प्रकाशन समारंभ

येथे आमचाही श्वास कोंडतो आहे, भुकेचा केंद्रबिंदू, काय तसे मी करू या पुस्तकांना पुरस्कार

**वरोरा :** कवितेचे घर, शेगांव बु. द्वारा वर्ष 2024-2025 या कालावधीत कविता, गझल आणि बालकविता अशा तीन विभागासाठी बापुरावजी पेटकर पुरस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र आणि इतर बाहेरील राज्यातूनही 158 च्यावर संग्रह प्राप्त झालीत.

प्रत्येक विभागासाठी रु 5000/-असे पुरस्कार जाहीर केले होते. या सर्व पुस्तकांचे राज्यातील नामांकित कवी, समीक्षक, प्राध्यापक मंडळींनी परीक्षण केलेत.

प्रभू राजगडकर, गजानन वाघमारे आणि प्रसेनजीत गायकवाड या कवीचे काव्यसंग्रह उत्कृष्ट ठरलीत. तसेच किरण भावसार, नंदकिशोर दामोदरे आणि मोहन काळे यांचे संग्रह विशेष उल्लेखनीय ठरलीत.

घामाचे संदर्भ, किनारे सरकत आहे आणि एकदा आपणच व्हावे मोर, अशा विशेष उल्लेखनीय संग्रहाचा सन्मान केला जाईल.

कवितेचे घर शेगांव बु. येथे तारीख 4 ऑक्टोबर रोजी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाला प्रसिद्ध लेखक आणि साहित्य अकादमी पुरस्कार




विजेते कवी डॉ. विनोद आसुदानी हे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रसिद्ध कवयित्री, लेखिका, अभिनेत्री मेघना साने या विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. गावातील उद्योजक प्रकाश पद्मावार हे हजर राहतील.

याच कार्यक्रमात मुंबई येथील कवी प्रा. भीमराव पेटकर यांच्या 'आयुष्याच्या वळणावर' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होईल.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चित्रकला पुरस्कार नारायणरावजी वरभे यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणार आहे. त्याच बरोबर स्थळ या चित्रपटाचे समीक्षा पुरस्कार कवितेच्या घरा तर्फे देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे संचालन सविता बगडे या करणार आहेत. अशी माहिती कवितेच्या घराचे कार्यवाह डॉ. प्रमोद नारायणे यांनी दिली.



# बहुजन हिताय संघाची सभा

**नागपूर :** वैचारिक संपन्नता म्हणजेच विचारांची श्रीमंती होय. तर तथागत बुद्धांची, महापुरुषांची विचारधारा हिच मुळची संपन्न विचारधारा आहे. बहुजनांचे संघटन असावे, उद्देश असावे. पंचशीलाचे प्रत्येक व्यक्तीने पालन केले पाहिजे, असे विजय इंगळे यांनी सांगितले. बहुजन हिताय संघाची 438 वी साप्ताहिक सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन येथे झाली. सभेला अध्यक्ष साधना इंगळे, अतिथी विजय इंगळे लाभलेले होते. प्रथम तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्यात आले. बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी उपस्थितांकडून त्रिशरण, पंचशील, बुद्ध वंदना सामुहिक वंदना झाली. अतिथी विजय इंगळे यांनी उपस्थिताकडून बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या. प्रज्ञापिठावर उपस्थित मान्यवरांचे पंचशील दुपट्टा आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. संचालन डॉ. शंकर खोब्रागडे, आभार बौद्धाचार्य प्रकाश सोनटक्के, भीम गीत रविन्द्र इंगळे, बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी धम्म पालन गाथा, राष्ट्रगीत संगीता पानतावणे, वर्षा टेंभेकर, अरुणा पाटील यांनी सादर केले. शांताराम रंगारी यांनी विशेष सहकार्य केले.

# बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त खोरिपाचे राष्ट्रीय अधिवेशन आज नागपूरात

**नागपूर :** रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस तथा राज्यसभेचे माजी उपसभापती दिवंगत नेते बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रिपब्लिकन पक्ष (खोरिपा)चे राष्ट्रीय अधिवेशन नागपूर येथील गुरुनानक भवन, राममनोहर लोहिया वाचनालयाशेजारी, अशोक नगर , इंदोरा, उत्तर नागपूर येथे मंगळवार दि 30 सप्टेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आले आहे सकाळी 10-30 वा झेंडावंदन करून अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे त्यानंतर उद्घाटन सत्रात देशातील विद्यमान राजकीय परिस्थिती- आव्हाने आणि उपाययोजना ह्या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे रिपब्लिकन पक्ष (खोरिपा)चे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ गोपीचंद मेश्राम यांच्या अध्यक्षतेखालील ह्या सत्रात तामिळनाडूतील रिपब्लिकन पक्षाचे नेते ए भिमराव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तसेच जेष्ठ रिपब्लिकन नेते, पत्रकार, विचारवंत मा रणजित मेश्राम, रिपब्लिकन पक्षाचे प्रवक्ते प्रशिक आनंद हे या विषयावर विचार मांडणार आहेत.



रिपब्लिकन पक्षाचे (खोरिपा) राष्ट्रीय प्रवक्ते डॉ एन.व्ही. ढोके यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी 12-30 होणार्या दुसऱ्या सत्रात रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीत महिला, युवक, विद्यार्थी यांचा सहभाग काळाची गरज ह्या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे या सत्रात मा रंजना वासे (समता सैनिक दल),प्रा सरोज शिंगाडे, संघमित्रा खोब्रागडे, दिपांकर कांबळे तसेच रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रकाश तारु हे विचार मांडणार आहेत. त्यानंतर सायंकाळी 4-00 वा रिपब्लिकन पक्ष ( खोरिपा)चे राष्ट्रीय अध्यक्ष मा देशक गिरीशबाबू खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली खुले सत्र होईल ह्यावेळी मध्यप्रदेशातील रिपब्लिकन पक्षाचे नेते माजी मंत्री मा डोमनसिंग नागपूरे, तामिळनाडूतील रिपब्लिकन पक्षाचे नेते माजी आमदार तामिल अर्सन, कर्नाटकातील रिपब्लिकन नेते एड अविनाश कट्टी, पक्षाचे सरचिटणीस उत्तमराव गवई, उपाध्यक्ष डॉ शिवशंकर बनकर, कोषाध्यक्ष सत्यजित खोब्रागडे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भाऊ निरभवणे, डॉ. देवेश मारोतराव कांबळे, अतिरिक्त सरचिटणीस तथा मध्यप्रदेश अध्यक्ष रासबिहारी शुक्ला, छत्तीसगड अध्यक्ष ओमप्रकाश मेश्राम, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस जीवन बागडे, विदर्भवादी नेते पक्षाचे केंद्रीय सल्लागार सुनिल चोखारे, सी.एम. रामटेके, भिमराव चौरे, पुरुषोत्तम शेंडे, दिगंबर वाकोडे, प्रा. अशोक ढोले, मध्यप्रदेशातील सहदेवराव गोडबोले, नानासाहेब देशमुख, हेमंत मोकळ, विनोद साळवी, नंदकुमार रोकडे, भागवत कांबळे, चंद्रकांत वाघमारे, पंजाबराव रामटेके, सुरेश दहिकर, छत्तीसगड महिला आघाडीच्या अध्यक्षा सिमा गेडाम, संजीवकुमार ईखारे, मुकेश शिंदे, भगवान मेढे, वाल्मिक येलेकर, विक्रांत पाटील, विनायकराव ताकसांडे, मुन्नाभाऊ खोब्रागडे, अरूण कांबळे आदी मान्यवर राज्याच्या विविध भागातून येणार आहेत स्वागताध्यक्ष विदर्भ प्रदेश अध्यक्ष सी.पी. रामटेके असून स्वागत समितीत डॉ. विनायक गणवीर,राजूभाऊ गजभिये, आनंद वानखेडे यांचा समावेश आहे हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी नागपूरातील पदाधिकारी सुदर्शन मुन, रवी पाटील, विशाल सरोजकर, सुदेश शेंडे, नागसेन कांबळे, चंद्रमणी गजभिये यांच्यासह सर्व सहकारी मेहनत घेत आहेत अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस जीवन बागडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



दैनिक
बहुजन सौरभ
बहुजनांच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचे मुखपत्र



दैनिक
जाहिरात दरपत्रक
पूर्ण पान - ४० हजार रूपये
अर्ध पान - २५ हजार रूपये
पाव पान - १० हजार रूपये
शुभेच्छा व्यक्तीशः फक्त ३ हजार रूपयांपांसून सुरू
वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो,तुम्हीपण वाचा!
टीप - पेमेंट अगोदर

धम्मचक्र प्रवर्तक दिन विशेषांक
आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.
:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल- bahujansaurabh@gmail.com
संपर्क -9422860648, 9421588901
बहुजन सौरभ

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648